# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ / आषाढ २५, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त व नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री** | |
| **(३)** | **वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८८**

---

### शिरगाव ते आमजाई व्हरवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या रस्त्याच्या दुरुस्तीसह भोगावती नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत

**(१) * १२३८९६ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरगाव ते आमजाई व्हरवडे (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) या अडीच कि.मी. लांबीच्या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने तसेच रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाल्याने रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रस्त्यावरील भोगावती नदीवरील बंधाऱ्याला ६० वर्षे पूर्ण झाली असून तो कमकुवत झाल्याने याठिकाणी नवीन पूल बांधण्यात येणार असून पुलाच्या बांधकामासाठी ९ कोटी रुपये मंजूर होऊनही अद्याप पुलाच्या बांधकामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शिरगाव ते आमजाई व्हरवडे या रस्त्याच्या दुरुस्तीसह भोगावती नदीवर नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सदर पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नाबार्ड २३ मधून मंजूर असून त्यास रु. ८५०.३५ लक्ष इतक्या किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे व तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक तयार करणे प्रगतीत आहे.

प्रश्नांकित शिरगाव ते आमजाई व्हरवडे हा इतर जिल्हा मार्ग क्र. ५८ च्या १.४०० कि.मी. अस्तित्वातील लांबी ही डांबरी पृष्ठभागाची आहे. सदरचा रस्ता अतिपावसाच्या विभागात येत असल्याने रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या रस्त्याच्या खराब पृष्ठभाग दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत लेखाशिर्षांतर्गत रु. १०.०० लक्ष मंजूर असून कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. पावसाळा संपल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे. सद्यस्थितीत या मार्गावर वाहतुक सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वासगांव ते चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) * १२२१३९ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासगांव ते चिंचणी (ता.डहाणू, जि.पालघर) या ४ कि.मी. लांबी असलेल्या रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने वारंवार अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रश्नांकित रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र. २३३ असून या रस्त्याची एकूण लांबी ५ कि.मी. आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी असून सदर रस्ता वासगांव, तणाशी चिंचणी गावांना जोडणारा रस्ता आहे. या रस्त्याच्या ०/०० ते २/१०० कि.मी. लांबीमध्ये खड्डे पडले होते परंतु खड्डे भरण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे. त्यापुढील २/१०० ते ५/०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे भोगाव (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) * १२४०७९ श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भोगाव (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सन २००७ ते २०१८ या कालावधीतील सरपंच व ग्रामसेवक यांनी कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून आलेले नाही तथापि याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांना केलेली दिनांक १३.०४.२०१७ रोजीची तक्रार जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्राप्त झालेली आहे, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे प्राप्त झालेल्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(३) चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) मा.लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना दिनांक १६.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्यासाठी कळविण्यात आले होते. तसेच दिनांक २७.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले. सदरचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत दिनांक ०५.७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला आहे.

-----------------

## वाशिम जिल्हयातील मध्यम व लघु प्रकल्पांमधील गाळ काढण्याबाबत

**(४) * १२४५४३ श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात सद्यस्थितीत ८० टक्के सिंचन प्रकल्प कोरडे पडले असून ठरावीक मध्यम व लघु अशा एकूण १९ प्रकल्पांमधील गाळ काढून त्यांची पाणी साठवण क्षमता वाढविण्यास जिल्हाधिका-यांनी मंजूरी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार केवळ चार प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आली असून नियोजन करुनही उर्वरित १५ प्रकल्पांमधील गाळ तसाच राहिला असल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित १५ प्रकल्पांमधील गाळ काढून त्यांची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) हे खरे नाही,

"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" या अभियानांतर्गत धरणातील गाळ काढणेकरिता जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिली आहे. जिल्हाधिकारी, वाशिम यांनी मंजूरी दिलेल्या १९ प्रकल्पांपैकी १३ प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातुन गाळ काढण्यात आला आहे.

तसेच सदर नमूद प्रकल्पा व्यतिरिक्त लोक सहभागातुन १४ प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील गाळ देखील काढण्यात आला आहे. धरणातून काढण्यात आलेल्या गाळाचे एकुण परिमाण ३,७५,०२९ घ.मी आहे.

(३) जिल्हाधिकारी वाशिम, यांनी मंजूरी दिलेल्या १९ प्रकल्पांपैकी उर्वरीत ६ प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातून गाळ काढण्याची लोकांची मागणी नसल्याने तसेच काही प्रकल्पात पाणीसाठा असल्यामुळे गाळ काढण्याचे काम झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेंबवणे जुवळेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे बांधण्यात आलेला बंधारा निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(५) * १२१५०० श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंबवणे जुवळेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेला बंधारा निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधा-याचे बांधकाम करण्यासाठी वाळूच्या ऐवजी ग्रीट वापरण्यात आले असून मोठे दगड बंधा-यात टाकण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणलोट बंधा-याच्या निकृष्ट कामासंदर्भात ग्रामस्थांनी तालुका कृषी विभागाकडे तक्रार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

दि.०७/०५/२०१८ च्या प्राप्त तक्रारीनुसार तालुका कृषि अधिकारी, संगमेश्वर यांनी १५/०५/२०१८ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता बांधामध्ये पायाखोदाई करताना निघालेल्या दगडांचा वापर केल्याचे तसेच ग्रीटचा वापर केल्याचे दिसून आले. त्यानुसार संबंधित कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून दि. १७/०५/२०१८ रोजी खुलासा मागविण्यात आला आहे. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी चिपळूण यांचेस्तरावर दि. २६/६/२०१८ रोजी क्षेत्रीय तपासणी करण्यात आली. त्यामध्ये प्रथमदर्शनी दगडाचा व ग्रीटचा वापर केल्याचे दिसून आले. उप विभागीय कृषि अधिकारी, चिपळूण यांचे पत्र दि. २७/०६/२०१८ अन्वये संबंधित कंत्राटदार यांना करारनामा व कार्यारंभ आदेशातील अटीशर्तीचा भंग केल्याबाबत व त्यांचे नाव काळया यादीत टाकणेबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे. संबंधित कंत्राटदारास झालेल्या कामाचे कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चिलखा (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-याचे दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(६) * १२५५०८ श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिलखा (ता.अहमदपूर, जि.लातूर) येथील कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा दुरुस्तीचे काम जलयुक्त शिवार योजनेतून सन २०१६-१७ मध्ये मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याने सदरचे कामाबाबत व राहिलेले अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद, अहमदपूर यांना कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे जिल्हा परिषद, लातूर यांचे आदेश दिले असतानाही अद्यापपर्यंत सदरहू काम पूर्ण करण्यात आलेले नसल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम हे दुरुस्तीचे असल्याने अंदाजपत्रकात प्रस्तावित केल्याप्रमाणे झालेले नसल्याने या कामाची पूर्णपणे जबाबदारी संबंधित कार्यालयाचे उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांची असतानाही हे काम गुत्त्तेदाराकडून पूर्ण करुन घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणातील संबंधित अधिकारी व गुत्तेदाराची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना दिनांक ९ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे कळवूनही अदयाप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

सदर कामांशी संबधित प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी सुरू आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे पुनस (ता.लांजा, जि.रत्नागिरी) गावातील कुंभारवाडी ते सावंतवाडी रस्ता व कुंभारवाडी ते उपळे (वीरगाव) जोडरस्ता अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७) * १२४७९२ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुनस (ता.लांजा, जि.रत्नागिरी) या गावातील कुंभारवाडी ते सावंतवाडी रस्ता तसेच कुंभारवाडी ते उपळे (वीरगाव) ५०० मीटर अंतराचा जोडरस्ता अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण रस्ते पूर्ण करण्यासाठी गावकऱ्यांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पुनस ग्रामपंचायत कार्यालयात निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्ते डांबरी नसल्यामुळे नागरिकांना विशेषत: पावसाळयात प्रवास करणे अतिशय गैरसोयीचे होत असुन कुंभारवाडी ते उपळे (वीरगाव) ह्या जोडरस्त्याचे ५०० मीटरचे अपूर्णावस्थेत असलेले काम पूर्ण झाल्यास किमान पाच किलोमीटर प्रवासाचे अंतर कमी होऊ शकेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार उक्त दोनही अपूर्ण रस्ते तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) प्रश्नामध्ये खालील दोन रस्त्यांबाबत विचारणा करण्यात आली आहे. या दोनही रस्त्यांची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून

अ) पूनस सावंतवाडी धाडवेवाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१४० दर्जाचा आहे. सदर रस्त्याची प्रत्यक्ष लांबी १.७४० कि.मी. आहे. रस्त्याच्या अस्तीत्वातील लांबीपैकी ०/०० ते ०/७३० कि.मी. पर्यतचे डांबरीकरण सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले आहे.

सन २०१३-१४ च्या अतिवृष्टी अनुदानातून कि.मी.०/७३० ते ०/९८० व १/१०० ते १/६०० पर्यतच्या लांबीचे मजबूतीकरणाचे व डांबरीकरणाचे काम प्रत्यक्षात फेब्रुवारी २०१५ मध्ये सुरु केले असता तेथील ग्रामस्थ यांनी रस्त्याच्या जागेसंदर्भात हरकत घेतली. जागेबाबत सहमती मिळविणेबाबत जि.प.सदस्य व ग्रामपंचायतीचे सदस्य यांचेमार्फत प्रयत्न करुनही संबंधीत ग्रामस्थ यांची हरकत कायम राहिल्याने या लांबी ऐवजी ०/७३० ते ०/८८१ व १/१०० ते १/७१८ पर्यतचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले. पुनस कुंभारवाडी ग्रामस्थांची पुनस बौध्दवाडी तेलीवाडी वीरमान ग्रामीण मार्ग क्र.१३९ या रस्त्याला ग्रामीण मार्ग क्र.१४० जोडून वाहतुकीची सोय करण्यात आली आहे.
संबंधीत ग्रामस्थ यांच्याशी वाटाघाटीने जमीन मिळविण्याचा प्रयत्न सुरु आहे.

ब) पूनस बौध्दवाडी तेलीवाडी वीरगाव ग्रामीण मार्ग क्र. १३९ दर्जाचा असून त्याची प्रत्यक्षात लांबी ३.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ०/४०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग ०/४०० ते ०/९२५ व १/६७५ ते ३/०० कि.मी. खडीचा पृष्ठभाग आहे. तसेच ०/९२५ ते १/६७५ कि.मी. लांबी अस्तित्वात नाही.
सदर अस्तीत्वात नसलेल्या जागेची जमीन मालकांकडून सम्मतीपत्र प्राप्त झाल्यावर वरील दोनही रस्त्यांची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे नागवे-कोळीद्र-श्रीपादवाडी-खळणेकरवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(८) * १२३०४४ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नागवे-कोळीद्र-श्रीपादवाडी-खळणेकरवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरवस्था झाली असून तो वाहतुकीसाठी अयोग्य झाल्याने उक्त रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी परिसरातील ग्रामस्थानी गत ३० वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास तहसिलदार कार्यालयासमोर उपोषणही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन २०१२-१३ पासून ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे वर्ग करण्यात आले आहेत. अशा प्रकारचे निवेदन माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) सदर रस्ता रस्ते विकास योजना २००१-२१ नुसार राज्य मार्ग १८९ ते कोळींद्रे श्रीपादवाडी नागवे हेरे ते प्रजिमा ७१ ला मिळणारा रस्ता इजिमा क्र.१७० असून त्याची लांबी ८.०० कि.मी.आहे.

सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ मध्ये रु.१४.९९ लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.

रस्त्याच्या उर्वरित लांबीसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील सुळे उजवा कालव्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(९) * १२४९८० डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील तापी खोरे महामंडळा अंतर्गत करण्यात आलेल्या सुळे उजवा कालव्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सन १९९८ ते २०१७ पर्यंत झालेल्या येथील कामावर २० कोटी ३६ लाख ८० हजार रुपये खर्च करूनही कालव्यात सोडण्यात आलेल्या पाण्याचा वेग फारच कमी असल्याने पाटविहीर गावांमध्ये पाणी पोहोचू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू कालव्याच्या निकृष्ट बांधकामाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार निकृष्ट बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) संबंधित शेतकरी व मा. लोकप्रतिनिधी यांनी मा. मंत्री (जलसंपदा) यांची भेट घेऊन" सदर कालव्याचे बांधकाम निकृष्ट झाले असून त्याची चौकशी करावी व सुळे उजव्या कालव्यास पूर पाण्याचे शेवटपर्यंत पाणी आवर्तन द्यावे", या आशयाचे निवेदन दिले आहे.

(२) किमी २१ पैकी किमी १७ पर्यंत पाणी पोहचते. पाटविहीर गाव कालव्याच्या पुच्छ भागात आहे. मार्च, २०१८ अखेर या कामावर रु. २०.३७ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(३) होय.

(४) सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पाचे संबंधीत अधिकारी, लाभधारक शेतकरी यांच्या समवेत दिनांक १९.०५.२०१८ रोजी कालव्याची पाहणी करण्यात आली असता, कालवा पूर्ण क्षमतेने वहन होण्यासाठी कालव्यावर कायमस्वरुपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. सुळे उजवा कालवा पूर्ण क्षमतेने वहन करण्यादृष्टीने तातडीने आवश्यक कामे करुन येत्या पावसाळयात पूर पाणी देण्याचे ठरले असून त्यानुसार तातडीने कामे हाती घेण्यात येऊन पाणी सोडण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालमृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ

**(१०) * ११६८२४ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राजु**

**तोडसाम (अर्णी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड)** **:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बालमृत्यू रोखण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर उपाययोजना करुनही माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीमध्ये १३ हजार ५४१ बालमृत्यू झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील सर्वाधिक म्हणजे २२ टक्के बालमृत्यू कमी वजनाच्या व अपुऱ्या दिवसांच्या अर्भाकांचे असून न्युमोनिया, जंतुसंसर्गामुळे ७ टक्के, अतिसारामुळे ०.३२ टक्के, श्वसनांच्या आजारामुळे ७ टक्के, श्वसनमार्गाच्या विकारामुळे १० टक्के  अशी बालमृत्यूची कारणे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बालमृत्युपैकी शून्य ते २८ दिवसांमध्ये ६५ टक्के बालमृत्यू झाले असून २१ टक्के बालमृत्यू २८ दिवस ते एक वर्ष, तर १४ टक्के बालमृत्यू हे एक ते पाच वर्ष वयोगटातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जन्मानंतरच्या पहिल्या एका तासात राज्यभरात ३५०० बालकांचा तर मुंबईत ४२४ बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात बालमृत्यू होत असलेल्या कारणांच्या अनुषंगाने बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) राज्यात एचएमआयएस अहवालानुसार सन २०१७-१८ मध्ये २४ तासाच्या आत एकुण ३७७८ अर्भक मृत्यू तसेच मुंबई मध्ये ४८३ बालकांचा मृत्यू झाल्याचे आढळुन आले.

(५) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येतात -

गरोदरपणातील संपूर्ण तपासणी व उपचार संस्थात्मक प्रसुती, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, जननी सुरक्षा योजना, नियमीत लसीकरण, नवजात काळजी कक्ष, एचबीएनसी व इन्टेनसिफाईड एचबीएनसी, जीवनसत्व “अ” व जंतनाशक मोहिम, बाल उपचार कैंद्र, पोषण पुर्नवसन कैंद्र, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत तज्ञामार्फत मातांची व बालकांची तपासणी व उपचार, नवसंजीवनी कार्यक्रमा अंतर्गत मातृत्व अनुदान योजना, भरारी पथकांमार्फत आरोग्य तपासणी व उपचार, दायी बैठक योजना, पालघरसाठी टास्क फॉर्स, पुनरागमन शिबिरे, खाजगी हॉस्पीटलचा सहभाग, स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग इ.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुलतानपूर (जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य कैंद्राच्या इमारत दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(११) * ११९४३१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलतानपूर (जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य कैंद्राच्या देखभाल दुरुस्ती व निवासस्थान इमारत दुरुस्तीच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

सुलतानपूर (जि.बुलढाणा) येथील सदर काम निकृष्ट झाल्याची तक्रार लोणार पंचायत समितीने सभेमधील ठरावाद्वारे जिल्हा परिषद बांधकाम विभागाला केली आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्याकरीता सहाय्यक अभियंता श्रेणी १, जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांची दि.१७.०५.२०१८ च्या पत्रान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंदूर- भोसूरस्थळ (ता.शिरुर, जि.पुणे) रस्ता जागेच्या हद्दी व सीमारेषा निश्चित न करता तयार करण्यात येत असल्याबाबत

**(१२) * ११८८७६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंदूर-भोसूरस्थळ (ता.शिरुर, जि.पुणे) रस्ता सध्या गट नं. ६११, ६१८, ६१९, ६२० ६२१, ६२२, ६२३, ६२५ व ६२६ या जमिनीच्या नंबरी बांधाने पिढ्यानपिढ्या वाहतुक व दळवळणासाठी अस्तित्वात असून सन २००५ साली पाटबंधारे विभागाने गट क्र. ६११, ६१२, ६२३ या जमिनीच्या सामायिक नंबरी बांधावर शिवार वाहतुकीसाठी कालव्यावर पूल बांधलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता वाहतूकीस सुस्थितीत असताना देखील सन २०१२ मध्ये नवीन रस्ता तयार करण्यासाठी ग.नं. ६१२, ६१३ या जमिनीची शासकीय मोजणी सहायक अभियंता, तहसिलदार यांच्या अर्जान्वये भूमिअभिलेख कार्यालयाने दिनांक २९ मार्च, २०१२ रोजी वा त्या सुमारास केली असता शेतीबांधाची हद्द ओढ्यात नवीन खुणेप्रमाणे झालेली असल्याने या जमिनीतून रस्त्याचे काम होणार नसल्याचे भोसुरे ग्रामस्थांना कळवून

दिनांक १६ मे, २०१२ रोजी मंडल अधिकारी, उप अभियंता, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या समक्ष सदरहू पंचनाम्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंदूर ग्रामपंचायतीने या जमिनीतून रस्ता करण्याची कार्यवाही चालू ठेवल्याने संबधितांनी घोडनदी येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असता न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदरहू रस्ता गट नं. ६१३ च्या एका बाजूस ओढ्यालगत असून सदरहू रस्ता या गट नंबर मधुन जात नसल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहा वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर माहे मे, २०१८ मध्ये केंदूर ग्रामपंचायतीने १४ व्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीतून पुन्हा उक्त गट नं. ६१३ च्या लगत एका बाजूने रस्ता तयार न करता गट नं.६१३ मधून करण्यास सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार जागेच्या हद्दी व सीमारेषा निश्चित करुन गट नं.६१३ च्या एका बाजूने ओढ्यालगत रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधिन रस्ता वाहतूक व दळणवळणासाठी अस्तित्वात असून सन २०१२ मध्ये नविन रस्ता तयार करण्याच्या अनुषंगाने दि. १६.०५.२०१२ रोजी मंडल अधिकारी, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम पुणे, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम पुणे, ग्राम विकास अधिकारी, व ग्रामस्थ यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. प्रस्तावित रस्ता गट नं. ६१३ च्या एका बाजूने ओढ्यालगत आहे अशा स्वरुपाचा पंचनाम्यात उल्लेख आहे.

तथापि शेतीबांधाची हद्द ओढ्यात नविन खुणेप्रमाणे झालेले असल्याने या जमिनीतून रस्त्याचे काम होणार नसल्याचे भोसुरे ग्रामस्थांना कळविल्याबाबतचा पंचनाम्यात कोणताही उल्लेख नाही.

(३) ग्रामपंचायतीशी मा.दिवाणी न्यायालय अगर प्रतिवादींनी कोणताही पत्रव्यवहार केलला नाही.
(४) व (५) सदर रस्त्याबाबत ग्रामपंचायतीने ई-निविदा काढून ठेकेदारास कामाचा कार्यारंभ आदेश दिला होता. तथापि सदर रस्त्याच्या कामाचे रेखांकन करण्याची कार्यवाही करताना गट नं. ६१३ मधील जागा मालक यांनी सदर रस्त्याच्या जागेबाबत आक्षेप घेतल्याने व जागेच्या हद्दी, सिमारेषा निश्चित न झाल्याने रस्त्याचे रेखांकन करण्यात आले नसल्यामुळे ग्रामपंचायतीने सदर काम सुरु न करण्याबाबत ठेकेदार यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत सदर रस्त्याचे काम बंद आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(१३) * १२१६२५ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेली कामे कंत्राटदार व अधिकारी यांनी संगनमत करुन कामे न करता देयके सादर करुन निधी घेतल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखलदरा तालुक्यातील नरेगा अंतर्गत वनविभागाची कामे माखला, सेमाडोह, रायपूर येथे करण्यात आली यामध्ये जंगलात चर खोदणे, दगडी बांध घालणे, सीसीटीव्ही तयार करणे, नाला बांधकाम व बंधारे आदि कामे निकषानुसार न करता निकृष्ट दर्जाची करुन कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांनी संगमनताने सदर कामे कागदोपत्री दर्शवून लाखो रुपयांचा शासनाचा निधी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैदयकीय विषयातील पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण असल्याची बनावट प्रमाणपत्रे सादर केलेल्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * ११७०४० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा**

**माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैदयकीय विषयातील पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण असल्याची बनावट प्रमाणपत्रे सादर करुन बेकायदेशीररित्या नोंदणी केलेल्या सुमारे २० डॉक्टरांवर महाराष्ट्र वैदयकीय परिषदेने कारवाई केली असून ५३ डॉक्टरांची अतिरिक्त पदवी (एमबीबीएस नंतर पोस्ट ग्रॅज्युएट पदवी) बनावट असल्याचे निदर्शनास आले असताना अदयापही सुमारे १०० संशयित डॉक्टरांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैदयकीय विषयातील पदव्युत्तर पदविका उत्तीर्ण बनावट प्रमाणपत्रे ७ ते ८ लाख रुपये घेवून देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या वैद्यकीय क्षेत्रातील गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी या प्रकरणातील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) याबाबत महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने आग्रीपाडा पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहितेनुसार संबंधित नोंदणीकृत व्यावसायीकांवर गुन्हा दाखल करुन कार्यवाही करण्याकरिता कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी परिषदेकडून चौकशी/ सुनावणीची प्रक्रिया सुरु असल्याने सद्यस्थितीत शासनाकडून चौकशी करण्याची बाब उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे.जे. रुग्णालयात कर्करोगाचा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(१५) * ११८६०२ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोग रुग्णांची संख्या वाढत असल्याने जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांना कर्करोगाच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत उपचारासाठी येणा-या रुग्णांची संख्या पाहता सर जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांनाही कर्करोगाचा अभ्यासक्रम सुरु करावा अशी मागणी केल्याचे पत्र सर जे.जे. रुग्णालयाच्या डॉक्टरांकडून मेडिकल काऊन्सिलकडे पाठविण्यात आल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर जे.जे. रुग्णालयात कर्करोगग्रस्त रुग्णासाठी बाह्य रुग्ण कक्ष (ओपीडी) सुरु करण्यात आला असून त्या बरोबरच सदरहू रुग्णालयात कर्करोगासंबंधीचा अभ्यासक्रमही वैद्यकीय विदयार्थ्यांसाठी उपलब्ध व्हावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

कर्करोगाच्या रूग्णांना जिल्हास्तरावर उपचार मिळावे यासाठी जिल्हा रूग्णालयाच्या डॉक्टरांना प्रशिक्षित करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने एम.डी.रेडीओथेरपी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली येथे सन २०१४ मध्ये अर्ज सादर केला असून भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने तपासणी करून त्रुटी दर्शविलेल्या आहेत. सदर त्रुटींची पुर्तता अधिष्ठाता, ग्रेन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(३) जे.जे. रूग्णालयात कर्करोग ग्रस्त रूग्णांसाठी बाहयरूग्ण कक्ष दि.०७.०३.२०१८ रोजी सुरु करण्यात आलेला आहे. परंतु वैद्यकीय विद्यार्थ्यासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

**(१६) * १२४९६५ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयामध्ये जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये रिचार्ज शाप्ट ची मंजूर केलेली कामे ही निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे सदर कामाची चौकशी करुन संबधितांवर कारवाई करण्याची लेखी तक्रार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद व जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार जलयुक्त शिवार योजनेंतर्गत रिचार्ज शाप्टच्या कामामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

या प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी दि.२६ जून, २०१७ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प. उस्मानाबाद यांच्या मार्फत करण्यात आलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करण्याबाबत संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांना कळविले होते. संचालक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांनी त्यापुर्वीच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने राज्यस्तरीय त्रिस्तरीय समितीची नेमणुक केली होती. राज्यस्तरीय समितीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये तथ्य आढळून येत नसल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दि. ५ मे, २०१७ च्या पत्रान्वये तक्रारदारास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंबस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील वाशिष्ठी नदीवर दळवटणे ते खेर्डी दरम्यान नवीन पूल बांधण्याबाबत

**(१७) * १२३१५६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबस्ते (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील वाशिष्ठी नदीवरील पूल जुना व कमकुवत झाला असून या पुलावरून वाहतूक वाढलेली असल्याने या नदीवर दळवटणे ते खेर्डी दरम्यान नवीन पूल बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी वारंवार संबंधितांकडे मागणी केली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वाशिष्ठी नदीवर दळवटणे ते खेर्डी दरम्यान नवीन पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

दळवटणे व खेर्डी ही दोन गावे रा.मा. ६६ वरील वाशिष्ठी पूलावरुन ६.३०० कि.मी. इतक्या अंतराने जोडली जात असून मागणी केलेला पूल झाल्यास ही दोन्ही गावे २.२५० किमी इतक्या जवळच्या अंतराने जोडली जातील. सद्यस्थितीत रा.मा. ६६ वर वाशिष्ठी नदीवर जुन्या पूला शेजारी नविन पूल बांधणेचे काम प्रगतीत आहे.

(२) अशा प्रकारची मागणी जिल्हा परिषदेकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्नांकित पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.

(४) प्रश्नांकित २५०.०० मीटर लांबीचा पूल हा खांदाट दळवटणे मोरवणे खडपोली प्रजिमा २७ व खेर्डी एम.आय.डी.सी. ग्रामा. १३५ या दोन रस्त्यांच्या दरम्यान योजनाबाह्य रस्त्यावर येतो.

उपरोक्त पुलासह जोडरस्त्यांसाठी अंदाजे रु. २१.६६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर रस्ता हा योजनाबाह्य रस्ता असल्याने त्यावर शासनाच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच जिल्हा परिषदेकडील विविध योजनांतर्गत प्राप्त निधीचे स्त्रोत पहाता इतका मोठा निधी प्राप्त करुन देणे शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जवळगाव (ता.बार्शी, जि.सोलापूर) मध्यम प्रकल्पाच्या कालव्यामधून पाणी गळती होत असल्याबाबत

**(१८) * ११७६७५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्पाच्या निकृष्ट दर्जाच्या कालव्यामधून लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार जवळगाव मध्यम प्रकल्पाच्या कालव्याची तातडीने दुरुस्ती व कालव्यामधून पाणी वाया जात असताना त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांनी कालव्याची पाहणी केलेली आहे.
(३) जवळगाव कालवा व त्यावरील बांधकामाचे पाहणीकरुन गळती दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील भोईरवाडी घाट रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) * १२०४११ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्याच्या आदिवासी भागातील भोईरवाडी घाट रस्त्याची गत वर्षीच्या पावसाळयात मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले असल्याने रस्त्यावर वारंवार अपघात घडून जीवित व वित्त हानी होत असल्याने पुढील काळात हा रस्ता बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता आहुपे-पाटण-भीमाशंकर या तीन खो-यांना जोडणारा रस्ता असून भविष्यात रस्ता दुरुस्त न केल्यास उक्त आदिवासी भागातील नागरिकांचा संपर्क तुटणार असल्याने या घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार भोईरवाडी घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या परिसरात असलेल्या मांजरा प्रकल्प कार्यालयाला आग लागल्याबाबत

**(२०) * १२३५१२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-(१) जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या परिसरात असलेल्या मांजरा प्रकल्प उपविभाग क्रमांक २ या कार्यालयाला माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत निम्न दुधना प्रकल्पासाठी शेतक-यांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या कागदपत्रांसह महत्वाचे दस्तावेज जळून खाक झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या परिसरात असलेल्या मांजरा प्रकल्प भूविकास स्थापत्य उपविभाग क्र. २, परभणी या कार्यालयास दि.२९/०५/२०१८ रोजी मध्यरात्री आग लागली होती.

(२) होय.

(३) या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून अहवालामध्ये कोणत्याही आक्षेपार्ह नोंदी आढळून आल्या नाहीत. जे दस्तावेज अर्धवट किंवा पूर्ण जळाले आहेत. त्यांचेबाबत अन्य कार्यालयातून माहिती घेऊन धारिकांची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. निम्न दुधना प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या

संपादित केलेल्या जमिनीची कागदपत्रे व दस्तावेज कायमस्वरूपी नष्ट झालेले नाहीत.

(४) या बाबत पोलीस स्टेशन, परभणीमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिना माढा उपसा सिंचन (ता.माढा, जि.सोलापूर) योजनेसाठी संपादित केलेल्या जमीनींचा मोबदला शेतक-यांना मिळण्याबाबत

**(२१) * १२४८१५ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिना माढा उपसा सिंचन (ता.माढा, जि.सोलापूर) योजना सन २००६ मध्ये कार्यान्वित झालेली असून सदर योजनेच्या कामासाठी संपादित केलेल्या जमीनीचा मोबदला अद्याप शेतक-यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या भूसंपादन कामासाठी संयुक्त मोजणी करणे अभावी भूसंपादनाची कार्यवाही प्रलंबित असून भूसंपादन तातडीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्‌नुसार सदरहू योजनेची भूसंपादन कामे विहीत कालावधीमध्ये पूर्ण करून संबधित शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमीनींचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) एकूण १८६ भूसंपादन प्रकरणांपैकी ६२ प्रकरणांमध्ये निवाडे घोषित करण्यात आले असून, शेतकऱ्यांना मोबदला वाटप करण्यात येत आहे.

(२) होय.

संयुक्त मोजणीची कार्यवाही ६४ प्रकरणांमध्ये पूर्ण झाली असून, उर्वरित ६० प्रकरणांमध्ये संयुक्त मोजणी संदर्भातील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) भूसंपादनाची सद्य:स्थितीत एकूण १८६ प्रकरणे असून, त्यापैकी ६२ प्रकरणांमध्ये निवाडा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापैकी ५४ प्रकरणांचे निवाडे भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार पूर्ण झाले असून, ०८ प्रकरणांमध्ये सरळ खरेदी द्वारे निवाडे करण्यात आले आहेत व त्यानुसार मोबदला देण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच ६४ प्रकरणात संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून, १६ प्रकरणांची मोजणीची वेळ व दिनांक भूमीअभिलेख कार्यालयाकडून त्वरित प्राप्त करून घेण्यात येऊन संयुक्त मोजणी पूर्ण करणेचे नियोजित आहे.

उर्वरित ४४ प्रकरणे उपविभागीय कार्यालयाकडे प्रलंबित आहेत. संयुक्त मोजणी झालेल्या प्रकरणांची पुढील मूल्यांकनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी केलेली फसवणूक

**(२२) * १२२२०९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घरकुल बांधकामाकरिता २५ ते ३० हजार रुपयांचा पहिला हप्ता घेऊन ३११२ लाभार्थ्यांनी मागील दोन वर्षात घरकुल बांधकामास सुरुवात न करता शासनाची ९ कोटी ३३ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार या लाभार्थ्यांवर कारवाई करण्यासह घरकुलांचे बांधकाम तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नांदेड जिल्हयातील पात्र ११,५२३ लाभार्थ्यांना अनुदानाचा पहिला हप्ता मंजूर करण्यात आला असून ८,७१४ लाभार्थ्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता मंजूर करण्यात आलेला आहे. पहिला हप्ता मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थ्यांपैकी २,८०९ लाभार्थ्यांनी पहिला हप्ता मंजूर करुनही त्यांनी जोता पातळी पर्यंत घरकुलाचे बांधकाम केल्याचे दिसून आलेले नाही.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये लाभार्थ्याने घरकुल पूर्ण न केल्यास त्याचे विरुध्द कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या नाहीत. तथापि, अशा लाभार्थ्यांना वारंवार सूचना देऊनही बांधकाम पूर्ण न केल्यास मंजूर केलेला निधी परत करण्यासाठी रिफंड मॉडयुल विकसित करण्यात आलेले आहे. त्यामुळे अशा लाभार्थ्यांनी त्यांना मंजूर केलेला निधी स्टेट नोडल अकाऊंट (एसएनए) मध्ये जमा करण्यासाठी सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांना कळविण्यात आले आहे.

नांदेड जिल्हयातील अपूर्ण घरकुलांचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यासाठी सचिव (ग्रामविकास) यांच्या स्तरावर आढावा बैठक घेण्यात येऊन सदर बैठकीतील सूचनेनुसार उपसचिव (ग्रामविकास) यांनी जिल्हा परिषद नांदेड येथे भेट देऊन सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत सूचना दिल्या. तसेच विभागीय आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावर आढावा बैठकी आयोजित करुन सदर घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याचे निदेश सर्व क्षेत्रिय अधिका-यांना देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंब्रा-कळवा (जि.ठाणे) दरम्यान असलेल्या रेतीबंदर परिसरात स्मशानभूमी उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * ११७०९३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव),**

**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-कळवा (जि.ठाणे) दरम्यान असलेल्या रेतीबंदर परिसरातील हजारो नागरीकांना स्मशानभूमीची सुविधा देण्यासाठी वन विभागाच्या अखत्यारितील आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, त्यानुसार रेतीबंदर परिसरातील स्मशानभूमी करिता लागणारी आवश्यक जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ठाणे येथील मुंब्रा-कळवा दरम्यान असलेल्या रेतीबंदर येथे स्मशानभूमी उभारण्यासाठी वनविभागाची जागा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वनविभागाकडे मागणी केली आहे.

(३) व (४) वनेत्तर प्रयोजनाकरीता वनजमिन वळतेकरणाची आवश्यकता असल्यास त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत प्रयोजनाकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन संबंधित प्रकल्प यंत्रणेने विहीत नमुन्यातील प्रस्ताव वन विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर प्रस्ताव अद्यापी वनविभागास अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त होताच वनविभागाकडून पुढील आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात येईल.

-----------------

## श्री बद्रीनारायण मंदिर, बहादुरपुरा (ता.पारोळा, जि.जळगांव) या तिर्थक्षेत्रास तिर्थक्षेत्र विकासातंर्गत “ब” वर्ग मंजूर करण्याबाबत

**(२४) * १२४५३९ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री बद्रीनारायण मंदिर, बहादुरपुरा (ता.पारोळा, जि.जळगांव) या तिर्थक्षेत्रास “क” वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरहू क्षेत्र परिसरातील, जिल्हा व देशभरातील भाविकांचे श्रध्दास्थान असल्याने तिर्थक्षेत्र विकास अंतर्गत “ब” वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून मंजूर करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री व प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्याकडे दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि, ग्रामविकास विभाग तथा अध्यक्ष राज्य निकष समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचे कार्यालयात झालेले बैठकीचे इतिवृत्तानुसार श्री बद्रीनारायण मंदिर संस्थान बहादरपुर ता.पारोळ, जि.जळगांव या स्थळास “ब”वर्ग दर्जा प्रदान केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पार्डी तिखे (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे ग्रामसेवकांनी केलेला गैरव्यवहार

**(२५) * १२४०३८ श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार्डी तिखे (ता.रिसोड, जि.वाशिम) येथे तत्कालीन ग्रामसेवकांनी संगनमताने गावांतर्गत दलीत वस्तीसुधार योजनेच्या खात्यातून व १४ व्या वित्त आयोगाच्या ग्रामपंचायतीच्या खात्यातून विकास कामे न करता लाखो रुपये काढल्याचे निदर्शनास येऊनसुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) वाशिम यांनी कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सभागृहाला प्रशासनाकडून खाते बदल करुन रिठद येथे बँक ऑफ महाराष्ट्र येथे असल्याची चुकीची माहिती देणे व प्रत्यक्षात खाते बदल केलेच नसल्याने याला गट विकास अधिकारी जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गट विकास अधिकारी, रिसोड यांनी संगनमताने संपूर्ण रिसोड तालुक्यामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची तक्रार स्थानिक सरपंच व नागरीकांनी केली आहे आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विडणी (ता.फलटण, जि.सातारा) येथील निरा-उजवा कालव्यावरील फाटा क्र.२५ ची दुरुस्ती करण्याबाबत

**(२६) * १२४९०६ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विडणी (ता.फलटण, जि.सातारा) येथील निरा-उजवा कालव्याला २५ फाटा येथे गळती लागल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असुन मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कालव्याचा सध्या पुल व पुलाजवळील भरावही खचला असुन संबंधित पाटबंधारे विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने केव्हाही दुर्घटना घडू शकते त्यामुळे या कालव्याच्या आसपासच्या अनेक लोकवस्त्यांमधील नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असुन नागरिकांनी याबाबत संबंधितांना कळविले असुनही अदयापी कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) गळती अल्प प्रमाणात असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाही.
(२) हे, खरे नाही.
(३) नीरा उजवा कालव्यावरील फाटा क्र. २५ च्या मुखाशी खालील बाजूस कालव्याच्या भराव्यातून होत असलेली गळती बंद करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करुन होणारी पाणी गळती दिनांक ३०.४.२०१८ रोजी तातडीने थांबविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येत असलेल्या शुल्कबाबत

**(२७) * ११७८६५ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख**

**(लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी वैदयकीय महाविदयालयांमध्ये सामान्य कोटयापेक्षा व्यवस्थापन कोटा आणि परदेशी विदयार्थ्याकडून पाचपट शुल्क आकारण्यात येत असल्याने शुल्क नियमन प्राधिकरणाने सामान्य कोटा व परदेशी विदयार्थ्यांकडून अधिकचे शुल्क घेण्याची तरतूद केली असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांना सामान्य कोट्याप्रमाणे व्यवस्थापन कोट्यात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी ५ पट शुल्क आकारण्याऐवजी ३ पट शुल्क घेण्यास शुल्क नियमन प्राधिकरणाने खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासनाला मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील महाविद्यालये ज्या भूखंडावर उभी आहेत ती सवलतीच्या दरात घेतली असून त्यांना शासनाने अनेक सवलतीही दिल्या असतांना अनेक न पटणारी कारणे पुढे करुन सदरहू महाविद्यालये ज्यादाची शुल्क आकारणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन सामान्य कोट्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) शुल्क नियामक प्राधिकरण यांनी दिनांक १९/०३/२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय/दंत महाविद्यालयांमधील पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क हे ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ३ पट व १५ टक्के अनिवासी भारतीय (एन.आर.आय) कोटयातील जागांसाठी ५ पट आकारण्याचा निर्णय घेतला होता.

त्याचप्रमाणे शासनस्तरावर संबंधित संस्था चालकांसोबत दिनांक १७/०४/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार ३५ टक्के संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ४ पट शुल्क आकारण्याबाबत निर्णय घेण्याची शुल्क नियामक प्राधिकरण यांना विनंती करण्यात आली.

त्यानुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांनी दिनांक २४/०४/२०१८ रोजीच्या ठरावान्वये खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन/ संस्थात्मक कोटयातील जागांसाठी ४ पट शुल्क आकारण्यास सहमती दिली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा आरोग्य विभागात श्वानदंशावरील अँटी रेबीज व्हॅक्सीन लसीचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(२८) * १२०६१६ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा आरोग्य विभागात श्वानदंशावरील अँटी रेबीज व्हॅक्सीन लसीच्या किंमतीत जीएसटीमुळे सुमारे ५० रुपयांची वाढ झाल्याने उत्पादक कंपन्यांकडून लसीचा पुरवठा होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यस्तरावरून मे, हाफकीन बायोफार्मास्युटीकल्स, मुंबई व्दारे दिनांक २६.०३.२०१८ रोजी दिलेल्या पुरवठा आदेशानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी, अकोला यांना १७५० श्वानदंश लसीचा साठा प्राप्त झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जळगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथील सिमेंट नाला बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(२९) * १२५६२० श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळगाव (ता.बारामती, जि.पुणे) येथील ग्रामस्थांसाठी २०१५-१६ मध्ये खासदार निधीतून मंजूर सिमेंट नाला बांधकाम निविदा प्रक्रिया पूर्ण न करताच बारामतीचे तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडल कृषी अधिकारी, कृषी सहायक यांनी पदाचा दुरुपयोग करून आर्थिक लाभासाठी सिध्दांत कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले, हे खरे आहे काय

(२) असलयास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मौजे जळगाव कडेपठार येथील गट क्र. ६ व ७ या ठिकाणी सिमेंट नाला बांधाच्या कामासंदर्भात अतिरिक्त प्रकल्प व्यवस्थापक, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे मार्फत चौकशी करण्यात येवून चौकशी अहवालावर कृषि आयुक्त, पुणे यांचेमार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत संबंधितांवर गुन्हे नोंद केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथे पर्यटन विकास महामंडळाने उभारलेले युथ हॉस्टेल सुरू करण्याबाबत

**(३०) * १२०३०० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील भूखंड क्र.१० वर पर्यटन विकास महामंडळाने ९ कोटी रूपये खर्च करून उभारलेले युथ हॉस्टेलचे काम पूर्ण होवून सहा महिने होवूनसुद्धा अद्यापही सुरू झाले नसल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर पर्यटन विभागाने सन २०१४ साली ४ मजली इमारतीच्या वस्तीगृहात १०० खोल्या, कॉन्फरन्स रूम, जेवणासाठी रेस्टॉरंट, व्यायामशाळा, ग्रंथालय, वाचनालय या सारख्या सुविधा उपलब्ध केल्या असून फर्निचर व इतर कामेही माहे डिसेंबर, २०१७ मध्ये पूर्ण होवूनही अद्यापही उद्घाटन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अल्प दरात पर्यटकांना निवासाची तसेच इतर सोयी उपलब्ध होण्यासाठी सदर युथ हॉस्टेल सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) होय.

(३) सदर युथ हॉस्टेलचे परिचालन करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे योग्य उद्योजकास देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तिलारी प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या गावांना धरणाचे पाणी दिले जात नसल्याबाबत

**(३१) * ११७५३५ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तिलारी प्रकल्पासाठी पिकुळे, उसप, मोर्ले, खोक्रन, झरेबांबर आदी गावांनी प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या असतांनाही धरणाचे पाणी या गावांना दिले जात नसुन या पुनर्वसन गावठाणात रस्ताही तयार करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर गावांना पाणी देण्यासह पुनर्वसन गावठाणात रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) तिलारी आंतरराज्य प्रकल्पासाठी झरेबांबर गावातील २१.५० हे. जमिन संपादित केली आहे हे खरे आहे. तथापि, पिकुळे, उसप, मोर्ले, खोक्रल या गावातील जमीन संपादित केलेली नाही. सदर गावांचे क्षेत्र मंजूर लाभक्षेत्रात येत नाही. पुनर्वसन गावठाणातील अंतर्गत सर्व रस्त्यांचे खडीकरण पुर्ण करण्यात आलेले आहे. सदरची सर्व गाव ठाणे ग्रा.पं. विभाग, जिल्हापरिषद जि.सिंधुदुर्ग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली असून त्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) जिल्हापरिषद जि.सिंधुदुर्ग यांनी दि. २८/०२/२०१२ अन्वये ताबा मिळालेबाबत कळविले आहे.

(३) तिलारी आंतरराज्य पाटबंधारे प्रकल्प ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग प्रकल्पग्रस्तांना महाराष्ट्र पुनर्वसन अधिनियम १९७६ सुधारीत १९८६ नुसार पुनर्वसित गावठाणातील नियमानुसार देय असणा-या १३ नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. या १३ नागरी सुविधामध्ये पुनर्वसन गावठाणातील अंतर्गत बहुतांशी रस्त्यांचे खडीकरण पूर्ण करण्यात आलेले आहे. गावठाणे ग्रा.पं. विभाग जि. सिंधुदुर्ग यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत पुनर्वसन गावठाणातील झरे-१,झरे-२ व कुडासे

स्मशानभूमिकडे जाणा-या रस्त्याचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया उपविभागीय अधिकारी (महसूल) सावंतवाडी यांचेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नरडवे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील महमदवाडी धरणग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * ११६६०५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरडवे (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावातील महमदवाडी धरणासाठी १९९६ साली अधिसूचना जाहीर होऊन सन २००१ मध्ये सदरहू धरणाच्या कामाला सुरुवात झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व संबधित यंत्रणेसह प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी यांच्या प्रलंबित मागण्याची पूर्तता करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली असता या बैठकीतही कोणत्याही मुद्यावर समाधानकारक तोडगा निघाला नसल्याने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी आढावा सभा घेण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार त्याची अद्यापपर्यंत पूर्तता झालेली नसल्याने धरणग्रस्तांनी दिनांक ७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास धरणाचे काम बंद करण्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी व अन्य संबधित अधिकाऱ्यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.

(४) सदर प्रकल्पाचा प्रधान मंत्री सिंचाई योजनेत समावेश केला आहे.

प्रकल्पाचा रु. १०८४.६६ कोटी किमतीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

कृती समितीच्या सदस्यांच्या सोबत आढावा बैठक घेवून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी करत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्याबाबत

**(३३) * १२०३२३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालायातर्फे राज्यातील सर्व २३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यासंबंधी वैद्यकीय संचालकांनी दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या स्थगितीचा आदेश दिनांक २० मार्च, २०१८ रोजी रद्द केल्याचे पुन्हा पत्र निर्गमित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय शिक्षण संचालकांनी जेनेरिक औषध सुरु करण्याच्या निर्णयास स्थगिती देण्याची व त्यानंतर पुन्हा स्थगिती उठविल्याचे पत्र निर्गमित करण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय रुग्णालयांत उपचार घेणाऱ्या गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांना स्वस्त दरात औषधे उपलब्ध व्हावी यासाठी जेनेरिक औषधांची दुकाने तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याविषयी वैद्यकीय शिक्षण संचालकांनी शासनास पाठविलेल्या दिनांक १६ मार्च, २०१८ च्या पत्रात “सदर प्रक्रिया आहे त्या टप्प्यावर थांबविण्यात

आलेली आहे” असे अनावधानाने टंकलिखित झाले होते. सदर वाक्य वगळण्याबाबत वैद्यकीय संचालकांनी दिनांक २० मार्च, २०१८ च्या पत्रान्वये शासनास कळविले होते.

(३) केंद्र शासन पुरस्कृत “प्रधानमंत्री भारतीय जन औषधी परियोजना” योजनेच्या मार्गदर्शक सूचनेच्या अनुषंगाने विभागाच्या नियंत्रणाखालील रुग्णालयांमध्ये जेनेरिक औषधे विक्रीसाठी प्रसिध्द करण्यात आलेली “स्वारस्याची अभिव्यक्ती” या ई निविदेच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील रस्त्यांच्या कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३४) * १२२५८७ श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील विविध योजनेंतर्गत मंजूर रस्त्यांची कामे कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द करून निविदा प्रक्रिया राबवताना कार्यकारी अभियंता व संबंधित अधिकारी यांनी कंत्राटदारांशी संगनमत करून मर्जीतल्या लोकांना निविदा मिळण्याकरिता विशेष अट लागू केल्याची बाब माहे जानेवारी मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदोष निविदा प्रक्रिया थांबविण्याकरिता माहे फेब्रुवारी मध्ये मा.ग्रामविकास मंत्री, जिल्हापरिषद अकोला मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार रस्त्यांच्या कामांकरिता कार्यक्षम कंत्राटदाराची नेमणूक करून गैरकारभार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तथापि सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणाची चौकशी करण्याच्या सूचना उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील नर्सी नामदेव संस्थानाला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देण्याबाबत

**(३५) * १२४४४० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील संत नामदेव महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव संस्थान या ठिकाणी देशभरातून लाखो भावीक वर्षाकाठी येत असुन त्यांची गैरसोय होत असल्याने या तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची सूचना शासनाने दिल्या असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार जिल्हा प्रशासनाने अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन नर्सी नामदेव संस्थानाला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तथापि, श्रीसंत नर्सी नामदेव संस्थानचा रू. २५.०० कोटीच्या मर्यादेत तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक ४ जून २०१५ अन्वये

जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सदर तीर्थक्षेत्राचा एकूण रु.२५.०० कोटी इतक्या किंमतीचा विकास आराखडा शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणाऱ्या २५ कोटींच्या मर्यादेत विकास कामांच्या आराखडयास मंजूरी देण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची बैठक दि. १५ फेब्रुवारी २०१८ रोजी पार पडली. सदर बैठकीत आराखड्यात प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांबाबत व त्यावरील अंदाजित रकमेबाबत चर्चा करण्यात आली. त्यावर मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी विकास आराखड्यातील कामांच्या अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदुरा व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातून जाणा-या विश्वगंगा व उपनद्यांच्या नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमाबाबत

**(३६) * ११९४२७ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातून जाणा-या विश्वगंगा व उपनदयांसाठी नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमातून सन २०१७-१८ या वर्षाकरिता २० कामांसाठी शासनाने ५००.०० लक्ष रुपये मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर कामे अद्याप सुरु न झाल्यामुळे या परिसरातील शेतक-यांच्या पाणी झिरपण्याच्या प्रक्रियेला बाधा निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या कामांना प्रशासकीय मान्यता देवून येथील नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमातून मंजूर कामे तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

शासन पत्र दिनांक १०/८/२०१७ अन्वये नांदुरा व मलकापूर तालुक्यातून जाणाऱ्या विश्वगंगा व उपनद्यांवरील २० सिमेंट नाला बांधाकरीता रू.५०० लक्ष निधी मंजूर केलेला आहे. पावसाळा संपल्यानंतर सर्वेक्षणाची कामे पूर्ण करण्यात येऊन २० सिमेंट नाला बांधापैकी १५ सिमेंट नाला बांधाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आली होती. तथापि, सदर कामे दि.२३/६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहीत केलेल्या मापदंडामध्ये बसत नव्हती.

दिनांक २३/३/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये सिमेंट नाला बांधाकरीताचे मापदंड कोल्हापुरी बंधाऱ्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या आर्थिक मापदंडाच्या १.४ पट करण्यात आले आहेत. त्यानूसार सद्यस्थितीत तयार असलेली १५ सिमेंट नाला बांधाची सविस्तर अंदाजपत्रके व उर्वरित ५ अशा एकूण २० सिमेंट नाला बांधांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात 'पोक्सो' या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(३७) * १२४१५२ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'प्रेरणा' या सामाजिक संस्थेने नुकताच राज्यात 'पोक्सो' कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात केलेल्या सर्वेक्षणात ७७ टक्के बाल कल्याण समित्यांमध्ये पिडीत मुलांसोबत संवाद साधण्यासाठी वेगळा कक्ष नसणे, ७५ टक्के बाल कल्याण समित्यांमध्ये ५ सदस्यांची पूर्ण समिती नसणे, जिल्हा बाल संरक्षण केंद्रांमध्ये मनुष्यबळाचा तुटवडा असणे या कायद्यांतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण अपुरे असणे इत्यादी अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत मुली-मुलांच्या संघर्षामध्ये महत्त्वाची भूमिका असल्याने या कायद्याची अंमलबजावणी करताना येणा-या विविध त्रुटी दूर करण्यासह या कायद्याची अंमलंबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) 'प्रेरणा' संस्थेचा अहवाल महिला व बाल विकास विभागास प्राप्त नाही.
(२) शासन अधिसूचना दि. ६.४.२०१८ द्वारे राज्यातील ३१ जिल्हयात बाल कल्याण समितीवर नव्याने अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर उर्वरीत ०५ जिल्हयांमध्ये यापूर्वी नियुक्ती झालेल्या बाल कल्याण समितीचे सदस्य काम करीत असल्याने एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये बाल कल्याण समिती कार्यरत आहे. एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या मार्गदर्शक सूचनेच्या अनुषंगाने जिल्हा बाल संरक्षण कक्षामध्ये तीन वर्षासाठी करारपद्धतीने कर्मचारी नेमणूक करण्यात आली होती. काम समाधानकारक असलेल्या कर्मचा-यांना दोन वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. बाल न्याय अधिनियम, २०१५, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ तसेच, महिला बाल विकास विभागांतर्गत बालकांचे संबंधीत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांबाबतचे प्रशिक्षण संबंधितांना देण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हापरिषदेच्या आयुर्वेदिक दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी नियुक्त करण्याबाबत

**(३८) * १२३४६६ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या सुरू असलेल्या १६ आयुर्वेदिक दवाखान्यापैकी १३ दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती न केल्याने सदरहू दवाखाने बंद अवस्थेत असल्याची बाब माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने नागरीकांना वैद्यकीय उपचार तालुका अथवा जिल्हा रुग्णालयांमध्ये जावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या आयुर्वेदिक दवाखान्यांमध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे

तथापि, सदर दवाखाना कार्यक्षेत्रातील नागरीकांना जवळच्या उपकेंद्रातील आयोग्य सेवक कर्मचाऱ्यांमार्फत आणि जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडुन प्राथमिक व प्रतिबंधात्मक उपचार दिले जातात.
(३) दिनांक ०५.०६.२०१८ च्या पत्रान्वये डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत कळविण्यात आलेले आहे. मागणीनुसार डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील नागेश्वरी धरणाचे काम निधी अभावी अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(३९) * १२४८७० प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील खाडीपट्टयातील १२ गावांना उपयुक्त ठरणा-या नागेश्वरी धरणाचे काम निधीअभावी मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव खाडीपट्टयाच्या परिसरातील आद्रे, तुडील, खुटील, नरवण, कुंबळे, आंबवली, नडगांव, सापे, वामने, रावढळ व गोठे या गांवाच्या नागरिकांना पाण्यासाठी वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नागेश्वरी धरणाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

महाड तालुक्यातील १७ गावांना सिंचनासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या नागेश्वरी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणाचे काम ८०% पूर्ण झाले असून अंशत: पाणीसाठा निर्माण झाला आहे.

योजनेच्या बुडीत क्षेत्रातील करंजाडी-बीजघर व मुमूर्शी नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनर्स्थापनेचे काम आणि रेवतळे पूल व रस्ता पुनर्स्थापनेचे काम पूर्ण झाल्याशिवाय तसेच प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता इ. अभावी प्रकल्पाची कामे प्रलंबित आहे.

(२) मौजे आदे, खुटील, नरवण, तुडील, कुंबळे, जुई, सोनघर, रोहण, आंबिवली बु. आंबिवली खु., नडगांव, सापे तर्फ तुडील, वामने, रावढळ, गोठे खु., सव व कोसबी अशी एकूण १७ गावे नागेश्वरी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असून प्रकल्पाची उर्वरित कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करून या गावांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

(३) प्रकल्पास सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे रु.२५.०० कोटी आणि पुनर्विनियोजनाद्वारे रु.१३.४४३४ कोटी असे एकूण रु.३८.४४३४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सदर निधीपैकी रु.५.७० कोटी इतकी रक्कम पुनर्स्थापनेचे काम, वक्रद्वार उभारणी इ. कामांकरिता व रु.३२.७४ कोटी भूसंपादनाकरिता खर्च करण्यात आली आहे.

द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार प्रकल्पाची अंदाजीत किंमत रु.११३.७० कोटी येत असून सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. यास्तव सन २०१८-१९ करिता लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिलोडा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील बंधाऱ्यामुळे बंद झालेला शेती वहिवाट रस्ता सुरु करण्याबाबत

**(४०) * १२०३२८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिलोडा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथे बंधाऱ्यामुळे बंद झालेला शेती वहिवाट रस्त्यामुळे गावातील शेतकऱ्यांची शेती पडीक राहून नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रील, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये सहय्यक अभियंता लघु सिंचन, जलसंधारण उपविभाग, नांदगाव खंडेश्वर यांच्या समवेत प्रत्यक्ष पाहणी करुन सदर बंद झालेला रस्ता सुरु करण्याबाबत दिनांक १५ ऑगस्ट २०१८ व ९ एप्रिल २०१८ रोजी कार्यकारी अभियंता लघु सिंचन, जलसंधारण विभाग, अमरावती यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शेती वहिवाट रस्ता सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर बंद पडलेला रस्ता सुरु करण्याकरिता बंधा-याच्या उर्ध्व भागास प्लॅटफॉर्म तयार करुन बंधा-यावरुन शेती वहिवाटीस रस्ता उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच बंधा-याच्या खालच्या बाजुस नलिका टाकुन भराव करण्यात आला असुन दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध करुन दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येरळा (ता.तासगांव, जि.सांगली) नदीकाठच्या गावांत पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(४१) * १२३५३८ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरळा (ता.तासगांव, जि.सांगली) नदीकाठच्या गावांत पाण्याची टंचाई निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येरळा नदीत पाणी सोडण्याचे आश्वासन देऊन आठ दिवस होऊनही अद्‌याप पाणी सोडण्यात आलेले नसल्याने पाणीटंचाईमुळे शेकडो एकर बागायत शेतीचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही, दिनांक २.५.२०१८ ते दिनांक १८.५.२०१८ या कालावधीत येरळा नदीत पिण्यासाठी पाणी सोडण्यात आले होते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरणगांव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत निकृष्ट दर्जाची कामे केल्याबाबत

**(४२) * १२१५२५ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथे जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत भोगावती नदीवरील जुन्या सातमोरी पुलास सलग्न असलेल्या बंधाऱ्याची दुरुस्ती व खोली करण्याच्या कामात बांधकामासाठी निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरण्यात येत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाहणीत निष्पन्न झाल्याचे दिनांक २८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, वाघुर नदीवर बंधा-याचे काम निकृष्ट होत असल्याने काम बंद पाडल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधा-याच्या दुरूस्तीचे काम अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदारानी अंत्यत नित्कृष्ट दर्जाचे केले असल्याने याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी जलसंधारण विभाग, जळगाव यांच्याकडे केली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यातबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ अंतर्गत सा.ब. वरणगाव, ता.भुसावळ या कामाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

सुनसगाव ता.भुसावळ येथील कोल्हापूर को.प.बं. संधानकाच्या दुरुस्तीचे काम दिनांक २५/०५/२०१८ रोजी सुरु करण्यात आले होते. सदर कामावर दि. २८/५/२०१८ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी भेट दिली असता सदर कामात कमी दर्जाची रेती वापरुन काम चालू असल्याचे निदर्शनास आल्याने स्थानिक लोक प्रतिनिधींनी तक्रार केलेली होती. याबाबत तात्काळ दखल घेवून संबंधित अभिकरणास व क्षेत्रिय अधिका-यांना नोटीस देण्यात आली. त्यानुसार सदर बांधकामात अंशत: माती मिश्रीत वाळु असल्याने झालेले बांधकाम काढून टाकण्यात आले व नविन चांगल्या प्रतीची गुणवत्तापुर्ण वाळु वापरुन दुरुस्तीचे काम पुर्ण करण्यात आले. सदर कामाचे ग्रीन होप फाऊंडेशन, जळगांव या त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा वगारटाकळी व माणुसधरी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील सिमेंट नाला बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(४३) * ११९३४२ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वगारटाकळी व माणुसधरी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथील शेतातील नाल्यावर सिमेंट नाला बंधारा नसताना तालुका कृषी अधिकारी यांनी निकष डावलून नाला खोलीकरणाचे काम करून गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी तालुका कृषी अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ अतंर्गत मौजे वगारटाकळी येथील कामासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीने काम तांत्रिकदृष्ट्या योग्य व गैरप्रकार झाला नसल्याचे अहवालात नमुद केले आहे.

मौजे माणुसधरी येथे खोलीकरणासह सिमेंट नालाबांधाचे काम केले आहे. सदर कामात कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे कृष्णा नदी घाटात मगरीने शाळकरी मुलावर केलेला हल्ला

**(४४) * ११९००९ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे दिनांक २७ एप्रिल,२०१८ रोजी वा त्या सुमारास कु.सागर सिदाप्पा डंगनवार या चौदा वर्षाच्या शाळकरी मुलावर कृष्णा नदीघाटात महाकाय मगरीने हल्ला करुन पाण्यात ओढून नेल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळकरी मुलाचा शोध शासनाने घेतला आहे काय,

(३) असल्यास, या नदीघाटात यापूर्वीही मगरीने अनेकांवर हल्ले केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नदीघाटावर मगरीपासून संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ब्रम्हनाळ (ता.पलूस, जि.सांगली) येथे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी कु.सागर सिदाप्पा डंगनवार (वय १४ वर्षे) या शाळकरी मुलावर कृष्णा नदीघाटात मगरीने हल्ला करुन पाण्यात ओढून नेल्याची घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने पोलिस व वनविभागाच्या पथकाने शोध घेतला असता सदर मुलाचा मृतदेह दिनांक २२.०४.२०१८ रोजी कृष्णा नदीच्या पात्रात आढळून आला आहे.

(३) व (४) सांगली जिल्ह्यातील मौजे हरिपूर ते आमणापूर या कृष्णा नदीच्या पात्रात सन २००३-२००४ पासून माहे एप्रिल, २०१८ पर्यत मगरीच्या हल्ल्यात ९ व्यक्तींचा मृत्यू तर १५ व्यक्ती जखमी झाले आहेत. सदर मृत व्यक्तींच्या कायदेशीर वारसास व जखमी व्यक्तींना प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

सांगली जिल्ह्यातील मौजे हरिपूर ते आमणापूर या कृष्णा नदीच्या पात्रात मगरीचे हल्ल्यांपासून संरक्षणाचे दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

• जनमाणसात प्रबोधन होण्याच्या दृष्टीकोनातून नदी किनारी खबरदारी घेणेबाबत माहीती दर्शक फलक लावण्यात आलेले आहेत.

• मगर प्रवण क्षेत्रात वनविभागामार्फत वेळोवेळी गस्त घालण्यात येते.

• सांगली वनविभागत आपात्कालीन स्थिती हातळण्याकरीता बचाव पथक (Rescue Team) गठीत करण्यात आलेले आहे.

• जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीकडील बोट व खलाशी यांच्या मदतीने नदी पात्रात गस्त घालण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आस्तान (ता.खेड, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायतीच्या विकास कामांच्या निधीमध्ये झालेला अपहार

**(४५) * ११८३६२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आस्तान (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील ग्रामपंचायतीच्या जलकुंभ, घरकुल, शौचालय, पाखाडी बांधकाम व दुरुस्त करण्याच्या विकास कामांच्या निधीमध्ये अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) १९६४ चे कलम ३ अन्वये कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार ग्रामपंचायतीच्या विकास कामाच्या निधीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) याप्रकरणी केलेल्या चौकशीनुसार कायम अपहाराची रक्कम रुपये ९,९७८/- ला तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक जबाबदार आहेत. त्यांचेकडून सदर रकमेच्या ५० टक्के प्रमाणे प्रत्येकी रु.४,९८९/- चा भरणा करुन घेण्यात आला आहे. तसेच, तत्कालीन सरपंचांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांचे विरुध्द ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ३९ च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली नाही. तत्कालीन ग्रामसेवक यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्ष थांबविण्याची शास्ती दि.२३/२/२०१८ च्या आदेशान्वये करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व अलिबाग येथील शासकीय रूग्णालयातील परिचारिकांच्या रिक्त पदांबाबत

**(४६) * १२०५४५ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील शासकीय रूग्णालयात परिचारिकांची एकूण ९५ पदे मंजूर असून त्यापैकी ५७ पदे भरली असून ३८ परिचारीकांची पदे रिक्त असल्यामुळे रूग्णाची होणारी गैरसोय टाळण्याकरीता २२ परिचारीकांची करार पध्दतीनुसार नियुक्ती करून ही रिक्त पदांची संख्या १६ वर आणण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवेअंतर्गत जिल्हयात एकूण ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८८ आरोग्य उपकेंद्रे कार्यरत असून एकूण ३४० आरोग्य सेवाकेंद्रां करिता फक्त ६२ परिचारीकांची पदे शासनाने मंजूर करून त्यापैकी ५९ पदे भरली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हयातील रुग्णांची परिचारीकांच्या रिक्त पदांमुळे गैरसोय होत असल्याने सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

अलिबाग येथिल जिल्हा रुग्णालयात शुश्रुषा संवर्गाची एकुण १५१ पदे मंजूर असुन त्यापैकी ९१ पदे भरलेली असुन ६० पदे रिक्त आहेत.

या व्यतिरिक्त राष्ट्रीय अभियानांतर्गत अधिपरिचारकांची १७ पदे कंत्राटी तत्वावर भरलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवे अंतर्गत ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८८ आरोग्य उपकेंद्रे अशी एकुण ३४० आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. ५२ प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता आरोग्य सहाय्यक (महिला) (परिचारिका) ६२ नियमीत मंजूर पदे आहेत. त्यापैकी ४६ पदे भरलेली आहेत व १६ रिक्त आहेत.

तसेच उपरोक्त ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रांकरीता आरोग्य सहाय्यक (महिला) (परिचारिका) २३ कंत्राटी पदे आहेत. त्यापैकी १८ भरलेली आहेत व ०५ रिक्त आहेत.

उपकेंद्राकरीता आरोग्य सहाय्यक (महिला) (परिचारिका) या संवर्गाची पदे अनुज्ञेय नाहीत.

(३) परिचारीकांची उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ.लाडघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत

**(४७) * १२१६२३ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.लाडघर (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील मराठी शाळा नंबर १ ते चंडीका मंदीर (खालचा मोहल्ला) या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याची पाहणी शासनाने केली आहे काय
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सदर विषयाची मागणी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्याकडे प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
(२) उप अभियंता, जि.प. बांधकाम, उपविभाग दापोली यांनी रस्त्याची पाहणी केली आहे.
(३) सदर रस्ता योजनाबाहय रस्ता असून हा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत आहे. या रस्त्याचा संपूर्ण ०.५०० कि.मी. खडीचा पृष्ठभाग खराब झाला आहे. तथापि, सदर रस्ता योजनाबाहय असल्याने ३०५४ रस्ते व पूल दुरुस्ती कार्यक्रम तसेच जिल्हा वार्षिक योजना इत्यादी कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंडीवली, खोपी-पिंपळवाडी, शिरवली (ता.खेड, जि.रत्नागिरी) या मध्यम पाटबंधारे प्रकल्पांतील पाणी धरणाच्या परिसरातील गावांना मिळण्याबाबत

**(४८) * ११७४२८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंडीवली, खोपी-पिंपळवाडी, शिरवली (ता.खेड, जि.रत्नागिरी) या मध्यम पाटबंधारे प्रकल्पांमध्ये वर्षभर मुबलक पाणी असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धरणांतील पाण्याचा उपयोग शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी होत नसल्याने तीनही धरणांच्या परिसरातील गावांमध्ये तीव्र

पाणीटंचाई निर्माण झाली असून धरण परिसरातील अनेक गावे व वाडयांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर धरणांमधील पाण्याचा उपयोग त्या त्या भागातील गावांना होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
कोंडीवली ल. पा. योजनेमध्ये पिण्यासाठी ०.६ द.ल.घ.मी. व पिंपळवाडी ल. पा. योजनेमध्ये पिण्यासाठी ०.६९ द.ल.घ.मी. पाण्याचे आरक्षण आहे. शिरवली ल. पा. योजनेमध्ये पिण्याच्या पाण्याचे आरक्षण नाही. या तीनही ल.पा. योजनांमधून मागणीनुसार सिंचनासाठी व पिण्यासाठी पाणी सोडण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील कृषी खात्यातील पाणलोट व मृद्संधारण विभागात झालेला गैरव्यवहार

**(४९) * ११६६४६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील कृषी खात्यातील पाणलोट व मृद्संधारण विभागात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार सातारा जिल्ह्यातील कृषी पर्यवेक्षकानेच केली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंडळ अधिकाऱ्यांची मान्यता न घेताच मापन पुस्तिकेतील रकमा तालुका कृषी अधिकारी यांनी स्वतः मंजूर करून मृद्संधारण कामातील खर्चातील २७ टक्के रकमेचा अपहार करून दहा टक्के लोकवाटा देखील पाणलोट विकास निधीत जमा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मजगी, सीसीटी, लूज बोल्डरची ३० टक्के कामे केली जात असून या कामाच्या ७० टक्के बनावट नोंदी केल्या जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, दि.०७/०५/२०१८ रोजी श्री.बी.डी.शेलार, कृषि पर्यवेक्षक यांनी निवेदन सादर केले आहे.

(२) यापूर्वी करण्यात आलेल्या चौकशीअंती रु.१६.९३ लक्ष पाणलोट विकास निधी (लोकवाटा) भरला नसल्याचे निदर्शनास आले आहे. तालुका कृषि अधिकारी यांनी प्रकल्प ४६ मधील मापन पुस्तिकेवर मंडळ कृषि अधिकारी तथा प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांची सही नसताना मापन पुस्तिका पारित केल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, २७ टक्के रकमेचा अपहार केल्याची बाब स्पष्ट झालेली नाही.या संदर्भात आयुक्त, कृषि यांनी दि. २९/०५/२०१८ अन्वये चौकशी समिती गठीत केली आहे.

(३) या संदर्भात आयुक्त, कृषि यांनी तपासणी पथकाची स्थापना केली आहे.

(४)संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव कृषि सह संचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि. १४/६/२०१८ अन्वये सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाडगाव ते उचलती (जि.औरंगाबाद) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५०) * १२२५७१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेंद्रा एमआयडीसी समोरील लाडगाव ते उचलती (जि.औरंगाबाद) या रस्त्याचे काम कंत्राटदारांनी निकृष्ट दर्जाचे केल्यामुळे अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला असून परिसरातील ग्रामस्थांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासदंर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या रस्त्याची पुन्हा दूरुस्ती करुन रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणा-या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैतरणा खोऱ्यातील पिंजाळ प्रकल्प आणि सूर्या प्रकल्पाचे (जि.पालघर) पाणी वसई-विरार, मिरा-भाईंदर व मुंबई महानगरपालिकेला देण्याचे केलेले नियोजन

**(५१) * ११६९७७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वैतरणा खोऱ्यातील पिंजाळ प्रकल्प आणि सूर्या प्रकल्पाचे पाणी हे जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका व मुंबई महानगरपालिकेला देण्याचे नियोजन शासकीय यंत्रणेकडून केले जात असल्याने पालघरमधील शेती सिंचन व पिण्याच्या पाण्याची समस्या कायम राहणार असल्याने पालघर मधील शेतकरी, कष्टकरी

संघटना यांनी दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास पालघर मधील हुतात्मा चौकात उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपोषण कर्त्यांची शासकीय यंत्रणेने दखल न घेतल्याने दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयास घेराव घातला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, सदर मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) सूर्या प्रकल्पातून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मिरा-भाईंदर महानगरपालिकेस एकूण १४६.३३ द.ल.घ.मी. इतके पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

वैतरणा खोऱ्यातील पिंजाळ प्रकल्पाचे काम अद्याप हाती घेतले नाही.
(२) दि.२०/०३/२०१८ रोजी उपोषणस्थळी कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांनी संघर्ष समिती कार्यकर्त्यांची भेट घेवून सूर्या प्रकल्पाच्या पाणी नियोजनाची माहिती दिली आहे. त्यामुळे दखल घेतली नाही, हे खरे नाही. तसेच दि. २२/०३/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, पालघर, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या उपस्थित सूर्या पाणी बचाव संघर्ष समिती, पालघर यांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) सूर्या प्रकल्पातून करण्यात आलेल्या बिगर सिंचन आरक्षणामुळे प्रस्तावित सुधारित जलनियोजनातील ६६६४ हेक्टर लाभक्षेत्राची कपात रद्द करण्यात येवून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पश्चिम क्षेत्रातील मीरा-भाईंदर व वसई-विरार शहर म.न.पा. क्षेत्रासाठी करण्यात आलेले बिगर सिंचन आरक्षण रद्द करावे, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी होती.

यानुषंगाने दि.०५/०५/२०१८ रोजी मा. राज्यपाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्राप्त निर्देशानुषंगाने नगरविकास, जलसंपदा, मृद व जलसंधारण आणि आदिवासी विकास या विभागांच्या सचिवांची सचिवस्तरीय

समिती गठीत केली आहे. या समितीने सूर्या प्रकल्पातून सिंचन क्षेत्राची कपात न करता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या अनुषंगाने सूक्ष्म सिंचन सुविधां (Micro Irrigation) सारख्या पर्यायांचा वापर करून पाणी वापर कार्यक्षमता (Water Use Efficiency) वाढवून जास्तीचे क्षेत्र सिंचित करण्याबाबत उपाययोजना सुचवावयाच्या आहेत. समितीच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहिणखेड-नळकुंड-कु-हा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५२) * ११९२३७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहिणखेड-नळकुंड-कु-हा (ता.मोताळा, जि.बुलढाणा) या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून मोठ्या प्रमाणात अनयिमितता होत असल्याची तसेच सदर रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार होत नसल्याची बाब दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करून या रस्त्याच्या कामाचा दर्जा सुधारण्याबाबत विभागाने संबंधीत कंत्राटदारास वारंवार सुचना करूनही सदर कंत्राटदार विभागाने केलेल्या सुचनेकडे दूर्लक्ष करून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास,सदहू रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार करण्याबाबत व रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणा-या संबंधीत कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) कंत्राटदारास सुरुवातीपासूनच कार्यपद्धतीने (Workmanship) मानकाप्रमाणे काम करण्याकरीता वेळोवेळी सुचना दिल्या आहेत व त्याप्रमाणे काम करुन घेण्यात येत आहे.

(३) वरीष्ठ गुणवत्ता निरीक्षक यांचे मार्फत सदर कामाची गुणवत्ता तपासणी दिनांक ३१/५/२०१८ रोजी करण्यात आली असता साखळी क्रमांक १/२७० ते २/७०० मध्ये खडीकरणात Filler Material चे प्रमाण जास्त आढळल्याप्रमाणे “U” असमाधानकारक शेरा देणेत आलेला आहे.

(४) व (५) सदर रस्त्याचे काम प्रगतीत असून कंत्राटदाराच्या खर्चाने त्रुटीपुर्तता करुन घेण्यात येत आहे.

-----------------

## कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील घाटमाथ्यावरील गावांचा टेंभू उपसा सिंचन योजनेत समावेश करण्याबाबत

**(५३) * १२१०१३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील घाटमाथ्यावरील गावांना कमी प्रमाणातील क्षेत्र लाभक्षेत्रात येत असल्याने या गावांचा टेंभू उपसा सिंचन योजनेत समावेश करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) मा.लोकप्रतीनिधी यांचे मागणीनुसार कवठेमहांकाळ तालुक्यातील घाटमाथ्यावरील घाटनांद्रे, तिसंगी, गर्जेवाडी, कुंडलापूर, वाघोली, रायवाडी या

गावांतील ८७२ हे. क्षेत्राकरीता टेंभू उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्र. ५ ची उपसा उंची २० मी. ने वाढवून गोरेवाडी डाव्या कालव्याव्दारे सिंचन सुविधा पुरविण्याचे नियोजित आहे. सदर प्रस्तावाचा टेंभू प्रकल्पाच्या द्वितीय सु.प्र.मा. मध्ये समावेश करण्यात आला असून सु.प्र.मा. बाबत कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झरी (जि.यवतमाळ) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(५४) * ११९९०२ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी (जि.यवतमाळ) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत १० कोटी २१ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोन वनपरिक्षेत्र अधिकारी, मुख्य कंत्राटदारासह सात जणांना यवतमाळ आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन पाटण तालुका झरी जामणी, जि.यवतमाळ येथे गु.र.क्र. २८/१४ कलम ४०९, ४६७, ४६८, ४७१ व १२० (ब) भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तपासाअंती एकूण ७ जणांना (६ वन विभागाचे कर्मचारी व १ खाजगी कंत्राटदार) दि. १५ मे, २०१८ रोजी यवतमाळ आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. वन विभागाच्या ५ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. यापूर्वी वन

विभागातील ३ अधिकारी यांच्याविरूध्द आरोपपत्र दाखल करण्यास मंजुरी मिळालेली असून तत्कालीन तहसिलदार, झरी यांच्याविरूध्द आरोपपत्र दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा सखोल तपास आर्थिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांचेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील महिला आर्थिक विकास महामंडळातील गैरप्रकाराबाबत

**(५५) * १२५१३७ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील महिला बचतगट विजयपूर, नवापाडा, मळखेडा येथे पोल्ट्रीफार्म बांधकामात महिला आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी यांनी गैरप्रकार केला असल्याने याची चौकशी करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी अशी तक्रार शासनाकडे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार या गैरप्रकारातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अशा प्रकारची तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने सर जे.जे. समूह रुग्णालयाकडून मागविलेल्या अहवालाबाबत

**(५६) * १२५५७० श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान वैद्यकीय निष्काळजीपणामुळे डोळे गमवावे लागलेल्या व्यक्तीच्या प्रकरणात अधिष्ठाता, सर जे जे समूह रुग्णालय यांना अभिप्राय सादर करण्याबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिष्ठाता, सर जे जे समूह रुग्णालय संबंधित डॉक्टरांना वाचविण्यासाठी वैद्यकीय अहवाल देण्यास विलंब करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार औरंगाबाद जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचास सदरहू अहवाल तातडीने उपलब्ध करुन देण्यासह विलंब लावणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

रुग्णालय प्रशासनाने सदर प्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रे पाठविण्याबाबत औरंगाबाद जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना मे २०१७ मध्ये कळविले आहे. तथापि याबाबतची कागदपत्रे प्राप्त झालेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(५७) * ११६७१९ श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर),**

**श्री.अनिल कदम (निफाड), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये मागील दीड वर्षापासून मधुमेह, एड्स, ताप,सर्दी, पडसे व उच्च रक्तदाबाच्या औषधाचा तुडवडा निर्माण झालेला असतांनाही उक्त औषधे खरेदी करण्यात आलेली नसल्याची बाब माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, आरोग्य केंद्र आदी ठिकाणी ताप, सर्दीसाठी येणा-या रुग्णांना पॅरासीटामोलच्या सुमारे ४५ कोटी गोळ्या, पॅरासीटामोल ड्रॉपच्या ९ लाख ६५ हजार बाटल्या, १ लाख इंजेक्शन्स आणि लहान मुलांसाठी सिरपच्या २५ लाख बाटल्यांची गरज असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागात ५ सनदी अधिकारी असताना औषध खरेदी वेळेत न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त औषधाचा साठा रुग्णालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यासह औषध खरेदी न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) सदर औषधांचा सार्वजनिक आरोग्य संस्थांची वार्षिक गरज खालीलप्रमाणे आहे :-

१) Paracetamol drop १५०mg - सुमारे २९ लक्ष

२) Inj. Paracetamol १५०mg/ml Ampule - सुमारे ३ लक्ष

३) Paracetamol Syrup १२५mg/५ml-६०ml bottle - सुमारे ७८ लक्ष

४) Paracetamol Tab ५००mg - सुमारे ४० कोटी

(३) दि. २७.०७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार दि. १५.०८.२०१७ पासून आरोग्य विभागास लागणारी औषधे मे. हाफकीन महामंडळ यांचेमार्फत खरेदी करण्यात येतात. त्यामुळे या खरेदीशी आरोग्य विभागाच्या सनदी अधिकाऱ्यांचा संबंध नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय सुरू करण्याबाबत

**(५८) * १२२८२१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे ग्रामीण रूग्णालय ३० खाटांचे असून तेथे आरोग्याच्या अपुऱ्या सोई सुविधा असल्याने हजारो रूग्णांची गैरसोय होत असल्याने सदर रूग्णालयाचे परिवर्तन ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयात करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही येथे सोई सुविधांयुक्त ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालय मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिंदेवाही येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय सुरु असुन त्याद्वारे रुग्णांना उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा देण्यात येत आहेत. सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरीकांकडून मागणी करण्यात आली आहे.

(२) सन २०११ च्या जनगणनेवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व सध्याच्या रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोड-बृहत् आराखडा तयार करण्यात येत असुन सिंदेवाही येथील ग्रामीण आरोग्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत् आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांचा खासगीकरण करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(५९) * ११६७१० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्राची अपुऱ्या साधन सामुग्री व मनुष्यबळा अभावी दुरावस्था झाली असल्याने या रुग्णालयांचे व आरोग्य केद्रांचे खासगीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक व खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर ३०० खाटांचे शासकीय रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालय खासगी संस्थांना देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालये खासगीकरण करण्याच्या निर्णयामुळे गरजू रुग्णांना शासकीय रुग्णालयातून मोफत व स्वस्त औषधे मिळण्या-या सेवा महाग

होणार असल्यामुळे राज्य सरकारी कर्मचारी संघटना, सेवाभावी संस्था, संघटना व डॉक्टर यानी या शासनाच्या निर्णयास विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचे धोरण निश्चित करण्याकरिता त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) व (५) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्यातील ३०० खाटांच्या शासकीय रुग्णालयाशी शासकीय वैदयकीय महाविद्यालय संलग्नीत करुन सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर खाजगी संस्थेस चालविण्यासाठी देण्यासंदर्भात शासनाचे धोरण निश्चित करण्याकरीता दि.२४.०१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. काही कर्मचारी संघटनांनी सदर शासन निर्णयास विरोध दर्शविला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिवळे (ता.भोर, जि.पुणे) येथे बिबट्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत व बिबट्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(६०) * ११९१३३ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यात बिबटयांचा वावर मानवी वस्तीकडे वाढला असून येथील दिवळे गावात बिबटयाच्या हल्ल्यात तीन व्यक्ती जखमी झाल्याची घटना दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या गावाच्या शिवारात तीन बिबटयांचा संशयास्पद मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बिबट्यांच्या मृत्यूची चौकशी शासनाने केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार बिबटयाच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांना आर्थिक मदत देण्यासह बिबट्यांच्या मृत्यू संदर्भात कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे दिवळे गावात दिनांक १९.०४.२०१८ रोजी बिबटयाच्या हल्ल्यात दोन व्यक्ती किरकोळ जखमी झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(२) मौजे दिवळे ता.भोर, जि.पुणे येथील मालकी गट नं.४७९ मधील क्षेत्रात दिनांक १२.०२.२०१८ रोजी तीन बिबटयांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

(३) व (४) बिबटयाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तींना वन विभागाने आवश्यक सहकार्य करण्यात आले असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १२.०२.२०१८ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी चौकशी सुरू असून मृत पावलेल्या बिबटयांच्या शरीराचे अवयव सी.सी.एम.बी. वैज्ञानिक प्रयोगशाळा, हैद्राबाद व उपसंचालक, प्रादेशिक न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा, गणेशखिंड, पुणे यांचेकडे मृत्यूचे कारण निश्चितपणे समजण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंगरगांव (ता.हदगांव, जि.नांदेड) येथे बांधण्यात आलेला मातीचा बंधारा वाहून गेल्याबाबत

**(६१) * १२५२२८ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु पाटबंधारे विभागाच्या वतीने डोंगरगांव (ता.हदगांव, जि.नांदेड) येथे बांधण्यात आलेला मातीचा बंधारा माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्याचे बांधकाम गुणवत्तापूर्ण करण्याचा आग्रह स्थानिक ग्रामस्थांनी कनिष्ठ अभियंता पाटबंधारे विभाग यांच्याकडे करुनही सदरहू बंधाऱ्याची पाहणीही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व तद्नुसार सदरहू बंधारा पुन्हा बांधण्यासह सदरहू निकृष्ट बंधारा बांधणाऱ्या अभियंत्यांवर कारवाई करण्यात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) डोंगरगाव ता.हदगाव जि.नांदेड येथे मातीचा बंधारा बांधण्यात आलेला नसून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सिमेंट कॉँक्रीट बंधारा बांधण्यात येत आहे. सदर बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर असून जून २०१८ मध्ये झालेल्या पावसाने बंधाऱ्याच्या बाजुचे (तीरावरील) वाहुन गेलेली मातीकाम ठेकेदाराकडून करुन घेण्यात येत आहे. कॉँक्रीट काम सुस्थितीत असुन त्यास कोणतीही बाधा झालेली नाही. काम गुणवत्तापुर्वक करण्यात येत आहे.

-----------------

## कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील गणोरे ग्रामपंचायतीत ग्रामनिधी, १४ वा वित्त आयोग निधी यासह पेसा निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(६२) * १२४९८९ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) तालुक्यातील गणोरे ग्रामपंचायतीत तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामनिधी, १४ वा वित्त आयोग निधी यासह पेसा निधी यात जवळपास ३० लाख ५० हजार ८४५ रुपयांचा अपहार केल्याचे कळवण पंचायत समितीने जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी यांना सादर

केलेल्या चौकशी अहवालात कळविल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून अपहार झालेली रक्कम तात्काळ वसूल करावी अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गणोरे ग्रामपंचायतीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करून अपहार झालेली रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, कळवण यांनी चौकशी करुन चौकशी अंती ग्रामनिधी, पेसा व १४ वा वित्त आयोग मिळून एकूण रक्कम रु. ३० लाख ५० हजार ८४५ इतका अपहार असल्याचे निदर्शनास आले आहे. तसा अहवाल कळवण पंचायत समितीकडून प्राप्त आहे.

(२) उक्त अपहार झालेली रक्कम वसूल करावी अशी मागणी दि.११/४/२०१८ च्या पत्रान्वये करण्यात आली असून संबंधित ग्रामसेवक कै.बाजीराव दादाजी देवरे हे दि.२७/६/२०१७ रोजी मयत झाले असून वर नमूद केलेल्या रक्कमेपोटी ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे उपअभियंता (इवद) जि.प. उपविभाग कळवण यांचे कडून मूल्यांकन करुन त्यानुसार होणाऱ्या मुल्यांकनाच्या रक्कमेनुसार एकूण खर्च व मुल्यांकन यांचा मेळ घेऊन मयत ग्रामसेवक यांच्या देय ठरणाऱ्या रक्कमेतून आणि तत्कालीन सरपंच यांचेकडून वसूलीची कार्यवाही करण्यात येईल.

(३) ही बाब पंचायत समिती स्तरावरील असून विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी चौकशी करुन प्राथमिक चौकशी अहवाल सादर केला आहे व गट विकास अधिकारी पंचायत समिती कळवण यांचे कडील दि.२०/१/२०१८ रोजीचा अहवाल प्राप्त आहे.

संबंधित ग्रामसेवक कै.श्री बाजीराव दादाजी देवरे हे दि.२७/६/२०१७ रोजी मयत झाले असून निवेदनातील नमूद केलेल्या रक्कमेपोटी ग्रामपंचायतीने केलेल्या

कामाचे उपअभियंता (इवद) जि.प. उपविभाग कळवण यांचे कडून मूल्यांकन करुन त्यानुसार होणाऱ्या मुल्यांकनाच्या रक्कमेनुसार एकूण खर्च व मुल्यांकन यांचा मेळ घेऊन मयत ग्रामसेवक यांच्या देय ठरणाऱ्या रक्कमेतून आणि तत्कालीन सरपंच व संबंधित जबाबदार पदाधिकारी यांचेकडून वसूलीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) संबंधितांवर कायमस्वरुपी अपहार निश्चित होताच सदर रक्कम वसूली बाबत व संबंधितांवर फौजादारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाची देखभाल-दुरुस्ती व विकास करण्याबाबत

**(६३) * १२३२१६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील कसबा येथील धर्मवीर संभाजी महाराजांच्या स्मारकाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाची पुरेशी स्वच्छता, देखभाल-दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यासह पर्यटनदृष्ट्या विकास करण्याची मागणी होऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ऐतिहासिक स्मारकाची देखभाल-दुरुस्ती व पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) कसबा येथे स्मारकासाठी मुबलक प्रमाणात जागा उपलब्ध नसल्याने मौजे रामपेठ (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धर्मवीर संभाजी महाराजांचे स्मारक हे श्री. छत्रपती संभाजी महाराज स्मारक मंडळ, रत्नागिरी या नोंदणीकृत प्रतिष्ठानाने जमिन खरेदी करुन शासनाच्या मदतीने स्मारकाचे बांधकाम पूर्ण केलेले आहे.

तसेच शासन निर्णय क्र.स्मारक-२०१६/प्र.क्र.०३/पंरा-९ दि.११ ऑगस्ट, २०१६ च्या तरतुदीनुसार स्मारक देखभाल व दुरुस्ती किंवा नुतनीकरणासाठी कोणताही निधी उपलब्ध करुन देता येत नाही.

सद्यस्थितीत स्मारकाचा ताबा व जमिनीची मालकी उक्त प्रतिष्ठानकडे असल्याने त्यांच्या मान्यतेशिवाय स्मारक परिसर पर्यटनदृष्टया विकसित करण्यासाठी कोणतीही कामे करणे शक्य होत नाही.

सदर स्मारक उपरोक्त मंडळाच्या ताब्यात असल्याने त्यांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित प्रतिष्ठानाची आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जारकरवाडी फाटा ते वैदवाडी (ता.आंबेगाव, जि.पुणे) रस्त्यावरील पुलाला संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(६४) * १२०४१२ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जारकरवाडी फाटा ते वैदवाडी (ता.आंबेगाव, जि.पुणे) रस्त्यावरील पुलाची दुरवस्था झाली असून पुलाच्या दोन्ही बाजूकडील लोखंडी संरक्षक कठडे पूर्णत: तुटल्याने वाहने कोसळून अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाला लोखंडी संरक्षक कठडे तातडीने बसविण्याबाबत तेथील ग्रामस्थांनी मागणी केली असूनही अद्यापि कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त पुलाला संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर पुलाची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(४) सदर पुल हा ग्रामीण मार्ग क्र. ६९ वा आहे. सदर पुलाचे संरक्षक कठडे अंशत: तुटलेले असून सदर काम सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या वार्षिक दुरुस्ती अंतर्गत उपलब्ध निधीनुसार करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोदवड, रावेर व मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील ग्रामपंचायतीकरिता कार्यालय बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(६५) * १२४५४५ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील मौजे हिंगणे (ता.बोदवड), मौजे सुतगांव (ता.रावेर), मौजे चिंचखेडा खु.मौजे टाकळी व मौजे जोंधनखेडा (ता.मुक्ताईनगर) या ग्रामपंचायतीकरीता ग्रामपंचायत कार्यालय बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त ग्रामपंचायतीकरिता ग्रामपंचायत कार्यालय बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० पर्यंत आहे व त्यांचे स्वत:चे ग्रामपंचायतीचे कार्यालय नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वत:च्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारत बांधकामाकरिता निधी देण्यासाठी मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना सुरु केली आहे.

या योजनेतंर्गत २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असल्यास सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) या तत्वावर ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम करावयाचे आहे.

त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी जनसुविधां मधून ग्रामपंचायतीचे बांधकाम करण्यासाठी मागणी केल्यास ग्रामपंचायतीचे बांधकाम करण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याबाबत

**(६६) * १२१०३२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत ७० लाख रूपये खर्च करून उभारलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊनसुध्दा सिडको प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने सदर प्राथमिक आरोग्य केंद्राचे उदघाटन झाले नसल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अडीच लाख लोकसंख्या असलेल्या कामोठे वसाहतीतील नागरिकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठी सदरहू प्राथमिक केंद्राची उभारणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कामोठे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र त्वरित सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) कामोठे येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी कागदपत्रांच्या पुर्ततेसह सिडकोकडे दि.०३.०४.२०१८ रोजी भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सिडकोकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आचिर्णे कडूवाडी (ता,वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील कांडराच्या ओहळावरील पापडी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(६७) * ११६७०६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचिर्णे कडूवाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील कांडराच्या ओहळावरील पापडी पुलाचे सन १९९७ साली बांधकाम करण्यात आले असून सद्यस्थितीत सदरहू पूल जीर्ण झाल्याने पुलाची दुरुस्ती करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन सार्वजानिक बांधकाम उपविभाग, वैभववाडी, कार्यकारी अभियंता, सार्वजानिक बांधकाम विभाग, कणकवली यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये व तत्पूर्वी करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने सार्वजानिक बांधकाम उपविभाग, वैभववाडी यांनी सन २०१५-२०१६ मध्ये पुलाची पाहणी करून पुलाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, सा.बा.विभाग कणकवली यांच्याकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरहू पुलाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजुरी देऊन तातडीने काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

आचिर्णे कडूवाडी येथील कांडराच्या ओहळावरील पापडी पुल कॉजवे असून त्याची दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) सदर कॉजवे सुस्थितीत असून त्यावरुन वाहतुक सुरुळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयामधील दिनदयाल उपाध्याय योजनेबाबत

**(६८) * १२४४४४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे दिनदयाल उपाध्याय योजना केवळ कागदावरच असुन चार तालुक्यांचे प्रस्तावच नसल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे हिंगोली जिल्ह्यातील अनेक गरजूंना या योजनेपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंदखेडराजा, देऊळगांवराजा आणि लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा नदीकाठच्या गावांना पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(६९) * १२०१२१ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा, देऊळगांवराजा आणि लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा नदीकाठच्या सुमारे ४० गावांत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीव्र पाणीटंचाईमुळे खडकपूर्णा प्रकल्पातून नदीत पाणी सोडण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार खडकपूर्णा प्रकल्पातून नदीत पाणी सोडण्यासह या गावातील पाणी टंचाई निवारणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) दि. २७/१०/२०१७ रोजी मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा पाणी आरक्षण समितीच्या बैठकीत खडकपूर्णा प्रकल्पातून देऊळगांव राजा, सिंदखेड राजा व लोणार तालुक्यातील ४४ गावांकरिता एकुण ६ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ०४ मे, २०१८ रोजी पाणी टंचाई लक्षात घेता व मागणी नुसार ६ द.ल.घ.मी. पाणी नदीपात्रात सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील म.आ. पोतदार रुग्णालयातील अतिदक्षता विभाग कार्यान्वित करण्याबाबत

**(७०) * १२३९४४ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील म.आ. पोतदार रुग्णालयातील अतिदक्षता (आय.सी.यु.) विभागास प्रशासकीय मान्यता देताना सदरहू विभागासाठी आवश्यक वैद्‌यकीय अधिकारी व कर्मचारी अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय यांनी नेमून त्यांच्या देखरेखे खाली विभाग कार्यान्वित करण्याबाबत स्पष्ट निदेश दिलेले असतानाही आजमितीपर्यंत या रुग्णालयात अतिदक्षता विभागाची सेवा सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अतिदक्षता विभागाच्या सेवेसाठी शासनाकडून नियमित मनुष्यबळ उपलब्ध होईपर्यंत करारपद्धतीने आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य संचालनालय, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्याचे निदेश मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक ३० नोव्हेबर,२०१५ रोजी वा त्यासूमारास दिलेले असतानाही आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयातील आय.सी.यु. विभाग तातडीने कार्यान्वित करण्याकरिता २ एम.डी. फिजिशियन (एम.डी. मेडिसिन) व २ अधिपारीचारिका यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत शासन मान्यता देण्यात आली आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयातील आय.सी.यु. विभागातील सर्व उपकरणे, मशिनरी आहे त्या स्थितीत अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यास मान्यता दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत देण्यात आली असल्याने सद्यस्थितीत विभागातील रुग्णाची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, म.आ. पोतदार रुग्णालयातील अतिदक्षता (आय.सी.यु.) विभाग कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

तथापि, सदर कंत्राटी डॉक्टर व कर्मचारी वर्गाचे मानधन CSR निधीतून देण्यास IDBI बँकेने तद्नंतर असमर्थता दर्शविली त्यामुळे कंत्राटी कर्मचारी वर्ग नियुक्त करता आला नाही.

(४) व (५) म.आ.पोतदार रुग्णालय, वरळी मुंबई येथील आय.सी.यु. (ICU) विभाग कार्यान्वित करणे शक्य नसल्याने व केलेला खर्च निरर्थक ठरु नये याकरिता आय.सी.यु. विभागामधील सर्व उपकरणे, मशिनरी आहे त्या स्थितीत खरेदीची संपूर्ण कागदपत्रे व इतर आवश्यक त्या अभिलेख्यासह अधिष्ठाता, सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १६/१२/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यामधील ग्रामीण भागाच्या आरोग्याच्या पायाभूत सुविधांकरीता कमी निधी मंजूर केल्याबाबत

**(७१) * १२३४६७ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामधील ग्रामीण भागाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पायाभूत सुविधांकरीता जिल्हा परिषद, आरोग्य विभागाने ३४ कोटी रुपयांची मागणी करूनही जिल्हा नियोजन विकास समितीमधून (DPDC) अवघे ६.६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी निधी मंजूर झाल्याचा परिणाम ग्रामीण भागातील आरोग्यसेवेवर होणार असून रुग्णांना मिळणा-या भौतीक सुविधा व औषध पुरवठ्यावर देखील त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामधील ग्रामीण भागाच्या आरोग्य सेवेकरिता आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामीण भागातील आरोग्य सेवेसाठी राज्यस्तरावरुन, तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आवश्यक निधी वितरीत करुन रुग्णांना औषध व अन्य सुविधा मिळवून देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हा रूग्णालयातील मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी 'स्मार्ट ओटी' उभारण्याच्या कामाबाबत

**(७२) * १२१३९० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा रूग्णालयात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी स्मार्ट ओटी उभारण्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने नियमितपणे होणाऱ्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया होत नसल्याने आजमितीस १७२ मोतीबिंदू रूग्ण शस्त्रक्रियेच्या प्रतिक्षा यादीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेची पर्यायी व्यवस्था माणगाव येथील शासकीय रूग्णालयात करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतल्याने स्मार्ट ओटीचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन जिल्हा रूग्णालयातच मोतीबिंदूच्या रूग्णांवर शस्त्रक्रिया व अन्य उपचार करावेत अशी मागणी रूग्णांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने जिल्हा सामान्य रूग्णालयात डोळयांच्या शस्त्रक्रियेसाठी स्मार्ट ओटी उभारण्याचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथील मॉड्युलर शस्त्रक्रिया गृह, ए.सी. नादुरुस्त असल्यामुळे दि.१०.११.२०१७ पासुन बंद होते. दुरुस्तीचे काम पुर्ण झाल्यानंतर ते दि.२२.०६.२०१८ पासुन सुरु करण्यात आले असुन मोतीबिंदू शस्त्रक्रिया सुरु करण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) गावाच्या विकास आराखडयातील कामे अपूर्ण असल्याबाबत

**(७३) * ११७५९१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव असलेल्या आंबडवे (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) गावाचा समावेश सांसद आदर्श ग्राम योजनेमध्ये करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत गावाच्या विकासासाठी ३७३ कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला असताना ग्रंथालय, शिल्पसृष्टी, सामाजिक सभागृह आदी कामे अदयाप अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) सांसद आदर्श ग्राम योजनेंतर्गत आंबडवे येथे उभारावयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम सिडको, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी नियोजित जागेचे TILR नकाशे व स्मारकासाठी उपलब्ध असलेल्या जागेचा तपशिल देण्याबाबत तहसील कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खडकवासला (जि.पुणे) धरण पात्रात व पात्रालगत भराव करून बांधकामे होत असल्याबाबत

**(७४) * ११६६९७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (जि.पुणे) धरण पात्रात व पात्रालगत भराव करून बांधकामे होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामे होत असतांना जलसंपदा, पर्यावरण, वन विभागांच्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले असून अनेक ठिकाणी

धरणाच्या प्रवाहाच्या वरसुद्धा बांधकाम करून अतिक्रमण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडकवासला धरण व धरणालगतच्या बांधकाम प्रतिबंध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भराव करून बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास येत असतानाही त्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार खडकवासला धरण व धरणालगतच्या बांधकाम प्रतिबंध क्षेत्रात अनिधकृतपणे बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) संबंधितांनी जाणीवपूर्वक गाळपेर जमीनीच्या नावाखाली पुन्हा अतिक्रमण केले आहे.

(३) नाही.

(४) हवेली पोलीस स्टेशन येथे दि.०२/०५/२०१६ रोजी संबंधितांविरुद्ध गुन्हयाची नोंद केली आहे. पोलीस बंदोबस्त उपलब्ध झालेनंतर अतिक्रमण निष्कासित करणेची कार्यवाही करणेत येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यावेतन वाढीसाठी प्रशिक्षित डॉक्टरांनी राज्यभर सुरु केलेले आंदोलन

**(७५) * ११७०९५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा),**

**श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय महाविद्यालयातील इंटर्नचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इटर्न (महाराष्ट्र) या संस्थेने विद्यावेतन वाढवून देण्याच्या मागणीसाठी वेळोवेळी केलेली आंदोलन व निवेदने देण्यात येऊनही त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे नागपूर येथील मेयो रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरांनी काम बंद करुन सर्जीकल कॉम्प्लेक्स पासून अधिष्ठाता कार्यालयावर मूक मोर्चा काढून अधिष्ठाता यांना मागण्यांचे निवेदन दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच मागणीसाठी राज्यातील विविध रूग्णांलयातील २७०० प्रशिक्षणार्थी डॉक्टर दिंनाक १२ जून २०१८ रोजी पासून संपावर गेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशिक्षणार्थी डॉक्टरांना ११ हजार रूपये प्रतिमाह विद्यावेतन देण्याचा निर्णय सन २०१५ मध्ये शासनाने घेतला असतांनाही त्या निर्णयाची अघापही अमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील प्रशिक्षाणार्थी डॉक्टरांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदरहू मागण्या मान्य करण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील शासकीय/महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता प्रशिक्षणार्थी यांनी दिनांक १३/०६/२०१८ ते १९/०६/२०१८(सायं. ०६.०० वाजेपर्यंत) या कालावधीत संप केला होता.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) आंतरवासिता (इंटर्नशिप) विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात रुपये ६०००/- वरुन रुपये ११०००/- इतकी वाढ करण्याबाबतची मागणी असून सदर विद्यावेतन वाढ करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत

**(७६) * १२०९६९ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाणा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालय स्तरावर दिनांक २२ मे २०१८ रोजी झालेल्या बुलढाणा जिल्हा आढावा बैठकीमध्ये सदर वैद्यकीय महाविद्यालयाच्या मंजूरीच्या अनुषंगाने सर्वेक्षण समितीमार्फत एक महिन्याच्या आत सर्वेक्षण करण्याबाबत संबंधितांना आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बुलढाणा मुख्यालयी सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बुलढाणा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्यामार्फत नियुक्त समितीने प्राथमिक तपासणी केली आहे. संचालक यांच्याकडून अनुषंगिक अहवाल मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगांव (फत्तेपूर) (ता.अचलपूर, जि.अमरावती) ग्रामपंचायतीने मागासवर्गीयांच्या घरासाठी राखीव ठेवलेल्या जमिनीची विक्री केल्याबाबत

**(७७) * १२२४१३ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव (फत्तेपूर) (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथील गट क्र. ०९ ही जमीन पूर्ववत गावठाण विस्तारासाठी गावातील बेघर, विधवा, निळापट्टा, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास समाजातील लोकांसाठी वडगांव (फत्तेपूर) ग्रामपंचायतीने सन २००७ पासून ग्रामविस्ताराच्या दृष्टीने राखीव ठेवण्याबाबतचे ठराव केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन ग्रामपंचायतीला कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच कोणतेही घोषणापत्र न काढता परस्पर काही अधिकाऱ्यांनी बाहेरील पुनर्वसित लोकांना शेतीसाठी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, त्यानुसार सदर जमीन बेकायदेशीरपणे देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह गट क्र. ०९ ही जमीन राखीव ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) दि.०५/०२/२००७, १५/०८/२०१५ व २२/०७/२०१७ रोजी पार पडलेल्या वडगांव (फत्तेपूर) (ता.अचलपूर, जि.अमरावती) येथील ग्रामसभेने वडगांव (बु.) च्या हद्दीतील गट क्र.०९ ही शासनाच्या मालकीची ई-क्लास जमिनीची जागा गावठाण वाढीसाठी तसेच दारिद्रय रेषेखालील भूखंड नसणा-या नागरीकांना भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव मंजूर केले आहेत.

(२) मौजे वडगाव फत्तेपूर येथील ई-क्लास गट क्र.०९, एकूण क्षेत्र ३.९४ हे.आर. पैकी १.२० हे.आर. जमीन शासन निर्णय क्र. डब्ल्युएलपी-१००७/प्र.क्र.१६/फ-१, दि.२३/०१/२००७ नुसार व्याघ्र प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या दोन प्रकल्पग्रस्तांना वहितीकरीता प्रदान करण्यात आली आहे. मौजे वडगाव फत्तेपूर मध्ये गट क्र.२३७ क्षेत्र ६.३१ हे.आर. एफ-क्लास जमीन गावठाण विस्ताराकरीता राखीव आहे. गट क्र.०९ हा गावठाण विस्ताराच्या दृष्टीने राखीव ठेवण्याबाबत ७/१२ वर नोंद नाही.

(३) वर नमूद प्रकल्पग्रस्तांना मंजूर झालेल्या जमीनीपैकी एक प्रकल्पग्रस्तास ताबा देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दुस-या प्रकल्पग्रस्तास जमीनीचा ताबा देण्यापूर्वी ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला असून विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे प्रकरण दाखल केले आहे. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दि.१६/०३/२०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५७ नुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दाद मागावी असे ग्रामस्थांना कळविले आहे. परंतु ग्रामस्थांनी अद्याप याबाबत जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे दाद मागितलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील माणगाव विभागातील कृषी खात्यामध्ये निविदा प्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(७८) * १२५२६५ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कृषी खात्यामध्ये माणगाव विभागातील निविदा प्रक्रियेमध्ये लाखो रुपयांचा गैरवापर होत असून माणगाव कृषी विभागातील अधिकारी स्वतःच्या नातेवाईकांना काम देत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणासंदर्भात लेखी तक्रार मा.मुख्यमंत्री, आयुक्त, कृषी विभाग पुणे, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, रायगड, उपविभागीय कृषी अधिकारी, माणगाव, विभागीय कृषि सह संचालक, कोकण विभाग यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

या संदर्भात तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ठाणे यांची आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रायगड यांनी कृषि उपसंचालक व तालुका कृषि अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. चौकशीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लॉटरी कंपन्यांकडून थकीत महसूलाची रक्कम वसूल करण्याबाबत

**(७९) * १२५७०९ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप संचालक तथा उप आयुक्त लॉटरी कर यांनी दिनांक २२ जुलै, २०१६ रोजीच्या पत्रान्वये माहे मार्च, २००७ ते ऑक्टोबर, २००९ या कालावधीतील लॉटरी कंपन्यांकडून शासनास ९३३.१४ कोटी रुपये महसूल येणे बाकी असल्याचे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉटऱ्या कंपन्यांकडून थकीत असलेल्या महसूलाची वसूली न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू महसूलाची वसूली न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्या येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) उच्च न्यायालयात लॉटरी प्रवर्तकांनी महाराष्ट्र लॉटरी कर अधिनियम,२००६ विरोधात याचिका दाखल केल्या होत्या. त्यावर दिनांक ६-३-२००७ रोजी तसेच २०-३-२००७ रोजी उच्च न्यायालयाने कायद्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जबरदस्तीची कारवाई न करण्याबाबत अंतरिम आदेश दिले. न्यायालयाने सन २००९ मध्ये अंतिम निर्णय दिला.

न्यायालयाच्या निर्णयानंतर नियमितपणे आगाऊ लॉटरी कर दिनांक ३०-६-२०१७ पर्यंत वसूल करण्यात आला आहे.

न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत सन २००७ ते २००९ या कालावधीत अन्य राज्यांच्या लॉटरी प्रवर्तकांनी लॉटरी कर भरणा केला नाही. महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ मधील कलम १८ नुसार जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसुली करण्याकरीता संबंधीत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले होते. तथापि, थकबाकीदार प्रवर्तक कंपन्या त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळून येत नाही असे जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांनी कळविले. तसेच बकायदाराच्या नावे चल/अचल संपत्ती निरंक असल्याचे जिल्हाधिकारी, नागपूर यांनी कळविले म्हणून सदरची थकीत लॉटरी कराची प्रकरणे, सहपोलिस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे कारवाईसाठी पाठविण्यात आली.

अन्य राज्यांच्या लॉटरी प्रवर्तक कंपन्याविरुध्द त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या लॉटरी विभागाची रु.९३३.१४ कोटी रक्कमेची फसवणूक केल्याने शिवडी पोलीस ठाणे गु.र. क्र.८९/१६ कलम ४२०,१२०(ब) भा.द.वि.स. सह कलम ३,४ सह १५ महाराष्ट्र लॉटरी कर अधिनियम अन्वये दि.१२-०९-२०१६ रोजी दाखल करण्यात आला असून आ.गु.वि.गु.र.क्र. ७८/१६ अन्वये या गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे विभागाकडून करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील सिंचन प्रकल्पाची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

**(८०) * ११६८०३ श्री.नारायण पाटील (करमाळा), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३५९ बांधकामाधीन सिंचन प्रकल्पाची किंमत ९४ हजार ४६३ कोटी रूपयांवर पोहचली असतांना सिंचन प्रकल्पांची काम प्रलंबित असल्याबाबतची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या प्रकल्पांचे काम सुरू आहेत त्यातील अनेक प्रकल्पांच्या कालव्यांना तडे गेले असुन त्यांच्या किंमतीत आणखी दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तापी, विदर्भ, गोदावरी, कोकण, कृष्ण खोरे पाटबंधारे विकास महामंडळ या वैधानिक आणि स्वायत्त सिंचन महामंडळाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग राज्यातील सिंचन विकासाची कामे करीत असून यासाठी या सर्व महामंडळाच्या एका वर्षात ३० दिवसांच्या कालवधीत किमान १२ बैठका होणे अपेक्षित असल्याची नियमात तरतूद असताना गेल्या सहा महिने झाले तरी नियामक मंडळाची बैठक झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने कृष्णा खो-यातील सर्व सिचंन प्रकल्पाची अपुर्ण कामे अद्याप पुर्ण केलेली नसल्याने माहे मे, २०१८ मध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ आयोजित आढावा बैठकीत मा.जलसंपदा मंत्री व राज्यमंत्री यांनी सदरहू कामे पूर्ण करुन सिंचन क्षमता अधिक वाढविण्यात यावी असे आदेश जलसंपदा विभागाच्या अधिका-यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार राज्यातील अपूर्ण सिंचनाची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) राज्यातील ३३४ बांधकामाधीन सिंचन प्रकल्पांची १ एप्रिल, २०१८ रोजीची एकूण उर्वरीत किंमत सुमारे रु.९४,४६३ कोटी इतकी आहे.
(२) दरसूचीमधील दरातील वाढ, भूसंपादन व पुनर्वसन किंमतीत वाढ, अनुषंगिक खर्चातील (आस्थापना इ.) वाढ इत्यादी कारणांमुळे प्रकल्पांच्या किंमतीमध्ये वाढ होणे स्वाभाविक आहे. तथापि, अनेक बांधकामाधीन प्रकल्पांच्या कालव्यांना तडे गेले, अशी वस्तुस्थिती नाही.
(३) विविध महामंडळांच्या नियामक मंडळांच्या बैठक खालीलप्रमाणे घेण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांची ९६ वी बैठक दि.३१/०१/२०१८ रोजी व ९७ वी बैठक दि.०६/०६/२०१८ रोजी झाली आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांची ६८ वी बैठक दि.३१/०१/२०१८ रोजी, ६९ वी बैठक दि.०८/०३/२०१८ रोजी व ७० वी बैठक दि.०६/०६/२०१८ रोजी झाली आहे.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांची ७१ वी बैठक दि.३१/०१/२०१८ रोजी व ७२ वी बैठक दि.०६/०६/२०१८ रोजी झाली आहे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांची ६५ वी बैठक दि.०६/०६/२०१८ रोजी झाली आहे.

व तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांची ५५ वी बैठक दि.३१/०१/२०१८ रोजी व ५६ वी बैठक दि.०६/०६/२०१८ रोजी झाली आहे.

(४) मा. मंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे उपस्थितीत दिनांक ०५/०५/२०१८ रोजी सिंचन भवन, पुणे येथे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या कामाबाबत आढावा बैठक संपन्न झाली. कृष्णा खोऱ्यातील विविध प्रकल्प हे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले असून उर्वरित सिंचन प्रकल्पही पूर्ण करून कृष्णा खोऱ्याची सिंचनक्षमता वाढविण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, अशा सूचना आढावा बैठकीमध्ये सर्व अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

(५) पुढील ३ वर्षामध्ये प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांस मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राथम्याने अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध करुन प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. तसेच राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट २६ प्रकल्पांना सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीसाठी रु.३८३० कोटीचे केंद्रीय अर्थसहाय्य व रु.१२७७३ कोटीचे दीर्घकालीन नाबार्डच्या कर्जास मंजुरी मिळाली असून केंद्रशासनाकडून निधी प्राप्त होत आहे. विदर्भ, मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त भागातील प्रकल्पांसाठी व उर्वरित महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागातील प्रकल्पांसाठी (८३ लघु व ८ मोठे व मध्यम प्रकल्प) रु.१५३२५ कोटी किंमतीचा विशेष अर्थसहाय्याचा (केंद्र : राज्य २५:७५) प्रस्ताव केंद्रशासनाच्या मान्यतेच्या अंतिम टप्यातआहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसेखुर्द प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनींचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत

**(८१) * १२२८३० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द प्रकल्पासाठी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी मोठया प्रमाणात संपादित करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी संपादित करण्यात येत आहेत त्याचे विक्रीपत्र तयार करीत असतांना अल्प प्रमाणात मोबदला देण्यात येत असून कमी भावात विक्रीपत्र तयार करण्यात येत असल्याने हजारो शेतकऱ्यांनी प्रति हेक्टरी दहा लाख रूपये वाढीव मोबदला मिळण्यासाठी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे महामंडळ नागपूर, मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प यांना लोकप्रतिनिधीसह शेतकऱ्यांनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गोसीखुर्द प्रकल्पासाठी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील संपादित करण्यात आलेल्या शेत जमिनीचे प्रति हेक्टरी दहा लाख रूपये वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) प्रकल्पासाठी आवश्यक जमीनीचे संपादन करणेत येत आहे.

(२) असे निवेदन क्षेत्रिय स्तरावर प्राप्त झाले आहे.

(३) निवेदनाचे अनुषंगाने दराची तपासणी केली असता, त्यातून असे प्रतीत होते की दर निश्चिती ही गावनिहाय होत असून त्या कालावधीमध्ये गावात झालेले खरेदी विक्री व्यवहार तसेच सदर कालावधीतील शीघ्र सिद्ध गणक (Ready Reacknor) यावर अवलंबून असते, या दोन्ही बाबी तपासून जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील मूल्यांकन समिती दर निश्चित करते.

यामुळे दिलेले दर हे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आहेत त्यामुळे वाढीव मोबदला देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात ‘सरोगसी’ तंत्रज्ञानाचा गैरवापर टाळण्यासाठी “टास्क फोर्स” ची निर्मिती करण्यात येणार असल्याबाबत

**(८२) * ११७०२१ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरोगसी तंत्रज्ञानाचा वापर नेमका कुणी करावा याबाबत अद्याप कायदाच अस्तित्वात नसल्याने सरोगसीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने ‘टास्क फोर्स’ ची निर्मिती करुन सरोगसी प्रक्रिया करणा-या रुग्णालयावर देखरेख करणारी यंत्रणा स्थापित केली जावी तसेच सरोगसी प्रक्रियेसंदर्भात अखिल भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे पालन केले जावे असे आदेश बाल हक्क आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरोगसी तंत्रज्ञानाचा गैरवापर करुन सरोगेट आईच्या मदतीने दोन मुली असताना जसलोक रुग्णालयात अविवाहीत असल्याचे बनावट शपथपत्र सादर करुन पुत्रप्राप्ती करणा-या पित्या विरोधात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी बालहक्क आयोगाने दिले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृत्रिमरित्या फलन करुन वंध्यत्वनिवारण करणाऱ्या केंद्रासह रुग्णालयांनी पीसीपीएनडी कायद्यांतर्गत नोंदणी केली असली तरीही प्रत्यक्षात ही केंद्रे सरोगसीद्वारे जन्माला आलेल्या मुलांची माहिती देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अखिल भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषदेने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सरोगसीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'टास्क फोर्स' ची निर्मिती करण्यासह गैरवापर करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्यात सरोगसी तंत्रज्ञानाच्या वापराबाबत अद्याप कायदाच अस्तित्वात नाही. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांनी प्रकरण क्र.९२ मध्ये दि.२२ मार्च, २०१८ रोजी पारित केलेल्या शिफारशीचा अभ्यास करुन या संदर्भात सरोगसी कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी दि.२.७.२०१८ च्या शासननिर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सावदा (जि.जळगांव) येथे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत करण्याबाबत**

**(८३) * १२४७७८ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा (जि.जळगांव) येथे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत करण्यासाठी पद निर्मिती व इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१८ मध्ये वा दरम्यान निवेदनाव्दारे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सावदा ग्रामीण रुग्णालय कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) ग्रामीण रुग्णालय, सावदा येथील पदनिर्मीतीस दि.२३.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधकामाकरीता अंदाज आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला असुन, त्यावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात होत असलेली अवैध वृक्षतोड

**(८४) * १२०१२३ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागात प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे कोळसा माफीया अवैध वृक्षतोड करुन त्याची बेकायदेशीर वाहतूक करत असल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार अवैध वृक्षतोड वाहतूक रोखण्यासह येथील कोळसा माफीयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) श्री.दिलीप गोवर्धन राठोड, रा.पाथर्डी यांनी मौ. कालवड, ग. नं. ७ येथील खाजगी जमिनीवर विनापरवाना कोळसा भट्टी लावून कोळसा साठविणेबाबत वनगुन्हा क्र. ६४०/२३, दि.१५.०४.२०१८ रोजी नोंदविण्यात आला आहे. तसेच श्री. राजू चंद्रभान राठोड, रा. पाथर्डी यांनी मौ. कठोरा, गट नं. २०८ मधील खाजगी जमिनीवर विनापरवाना कोळसा भट्टी लावून कोळसा साठविणेबाबत वनगुन्हा ६४०/२५, दि.१५.०५.२०१८ रोजी नोंदविण्यात आला असून प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ६८ (१) (ए) मधील तरतुदीनुसार सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक व

कॅम्पा), बुलढाणा यांच्या अनुक्रमे दि.२१.०४.२०१८ व दि.२१.०५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये अपराधाबद्दल प्रत्येकी रू.५०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्यामार्फत अवैध वृक्षतोड व वाहतूक रोखण्याकरिता वनक्षेत्राची नियमित तपासणी व गस्त करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिरवली वेलोंडेवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत

**(८५) * ११७७६७ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरवली वेलोंडेवाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे सिमेलगत लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम ४० टक्के पूर्ण झाल्यानंतर गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची पूर्तता न झाल्याने सदरहू काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) प्रकल्पाचे काम १५ % पूर्ण झाले आहे.

(२) होय.

सदर प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया जुन्या भूसंपादन कायद्या प्रमाणे प्रगतीपथावर होती, परंतु सदर प्रस्ताव सन २०१३ च्या नविन भूसंपादन कायद्यामुळे व्यपगत झाले. प्रकल्पग्रस्तांच्या भूसंपादन मोबदला विषयक मागण्यांची पूर्तता न झाल्याने काम प्रलंबित आहे.

(३) येलोंदवाडी प्रकल्पांतर्गत मौ. नारदखेरकी, देवखेरकी व शिरवली ही गावे बाधित होत आहे. त्यापैकी मौजे नारदखेरकी व देवखेरकी या गावातील प्रकल्पग्रस्तांचे खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने भूसंपादन करावयाच्या

रु.५३.३२ कोटी च्या प्रस्तावास जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दि.२७/१०/२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूरी दिली. त्यापैकी रु.२४.९० कोटी चे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित मोबदला वाटपाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच मौजे शिरवली गावच्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुळशी (जि.पुणे) येथे रामनदीच्या ब्ल्यू लाईन-रेड लाईनमध्ये भराव करून इमारती उभारल्याबाबत

**(८६) * ११७३८६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) येथे स्काय आय या बांधकाम व्यावसायिकाने रामनदीच्या ब्ल्यू लाईन-रेड लाईन मध्ये भराव करून इमारती उभारल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला पाटबंधारे विभागाने दर्शविलेल्या रामनदी-१, भूगाव तळे चॅनल ०/०० ते रानवारा चॅनल ७१०० मीटर च्या परिक्षेत्रात ब्ल्यू लाईन-रेड लाईन मध्ये भराव करून स्काय आय आयरिस प्राइम या नावाने क्र.३, ४, ४अ, ५, ६, ७, ८, ९, १६, १५ टॉवर उभे केले असून काम वेगाने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्काय आय आयरिस प्राइम या बांधकाम व्यावसायिकाने सदर प्रकल्प उभारतांना जलसंपदा, पर्यावरण व वन विभागाचे नियम डावलून केली असून अनेक ठिकाणी नदीचा प्रवाह रोखून बांधकाम करून रस्ते ही विकसित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय लाभार्थ्यांच्या "थेट लाभ हस्तांतर (डीबीटी)" या योजनेबाबत**

**(८७) * ११७१४५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय योजनेचा फायदा थेट लाभार्थ्यांना मिळावा यासाठी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे टाकले जाण्याच्या "थेट लाभ हस्तांतर" (डीबीटी) या योजनेला विविध विभागाकडून विरोध केला जात असून, लाभार्थ्यांना थेट पैसे न देता पूर्वीप्रमाणेच वस्तू खरेदी करुन दिल्या जाव्यात याकरिता नियोजन विभागाकडे शिक्षण, कृषी व अल्पसंख्यांक विभाग मागणी करीत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे कायव त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार "थेट लाभ हस्तांतर" (डीबीटी) च्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. हे खरे आहे.

(२) नियोजन विभागाच्या दिनांक ५.१२.२०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विविध कल्याणकारी योजनांमध्ये व्यक्तीगत लाभार्थ्यांना वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, त्यांच्या बँक खात्यात थेट लाभ

हस्तांतरण (DBT) करणेबाबतच्या प्रक्रियेतून वस्तू वगळणेबाबत मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर विचारविनिमय करुन मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेकरीता प्रस्तावित करणे तसेच यासंदर्भात उपस्थित होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन विभागाच्या दिनांक १२.४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये छाननी समिती स्थापन करण्यात आली आहे.

(३) नियोजन विभागाच्या दिनांक १५.३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये "चष्मा" ही बाब तसेच दिनांक ४.७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये फक्त चालू शैक्षणिक वर्षाकरीता "गणवेश" ही बाब डीबीटी प्रक्रियेतून वगळण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुकोंडी (ता.दापोली, जि. रत्नागिरी) येथे गिधाडांच्या संवर्धनासाठी उभारण्यात आलेले पहिले खाद्य केंद्र बंद झाल्याबाबत

**(८८) * ११७०८० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकोंडी (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे राज्यातील नामशेष होणाऱ्या पक्षांच्या यादीतील गिधाडांच्या संवर्धनासाठी उभारण्यात आलेले पहिले, खाद्यकेंद्र बंद झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे खाद्यकेंद्र चालवण्याकरिता वन विभागाकडे निधी नसल्याने परिसरातील स्थानिक गावकऱ्यांना मृत जनावरे खाद्यकेंद्रात टाकण्याकरिता पुरेसा निधी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुकोंडी येथील बंद अवस्थेत असणारे गिधाडासाठीचे खाद्यकेंद्र सुरु करण्याकरिता स्थानिकांना मृत अवस्थेतील जनावरे सदर खाद्यकेंद्रात टाकण्याकरिता निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजे सुकोंडी ता.दापोली येथील परिसरात वनविभागाची जागा नसल्याने भाडे तत्वावर जागा घेऊन गिधांडांकरिता खाद्य केंद्र चालविण्यात येत आहे. जागा मालकाने जागा भाडयाने देण्यास एप्रिल, २०१७ पासून नकार दर्शविला होता. तथापि, गिधाड खाद्य केंद्राकरिता योग्य ठिकाण मिळत नसल्याने जमीन मालक श्री. मंदार रमेश शिंदे यांनी प्रति वर्ष भाडे वाढ करुन जागा भाडे तत्वावर देणेस संमती दर्शविली आहे. त्याअनुषंगाने गिधांडांकरिता खाद्य केंद्र सुरू करणेची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**नागपूर.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.